cmyk

## संपादकीय

### एककल्ली तानाशाही भारताच्या मुळावर !

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे अत्यंत लहरी, विक्षिप्त, अविश्वासार्ह व तितकेच माथेफिरू राजकारणी म्हणून प्रसिद्ध आहेत. अमेरिकेच्या अध्यक्षपदावर विराजमान झाल्यापासून ट्रम्प यांच्या या गुणावगुणांचे वारंवार जगाला दर्शन घडत असल्याचे दिसून येते. भारतातून होणाऱ्या निर्यातीवर २५ टक्के वाढीव आयातशुल्क लादण्याचा आणि रशियाशी व्यापार केल्याबद्दल भारताला दंड सुनावण्याची त्यांची घोषणा हा त्याचाच परिपाक मानावा लागेल. भारत आणि रशिया यांच्यात जुना दोस्ताना आहे.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### पंकजा मुंडेंनी चिमुकल्यांसोबत साजरा केला मैत्री दिन

परळी-मंत्री पंकजा मुंडे आज परळी मतदारसंघात आहेत. यादरम्यान पंकजा मुंडेंना भेटण्यासाठी आणि मतदारसंघातील कामकाजा संदर्भात चर्चा करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सकाळपासूनच यशश्री निवासस्थानी गर्दी केली आहे. कार्यकर्त्यांच्या या भेटीने जनता दरबाराचे स्वरूप आले आहे. तर मैत्रीदिनानिमित्त पंकजा मुंडेंना भेटण्यासाठी काही चिमुकल्या आवर्जून यशश्री निवासस्थानी आल्या. या चिमुकल्या सोबत पंकजा मुंडे यांनी मैत्री दिन साजरा केला.

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–१०० सोमवार, दि.४ ऑगस्ट २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### गाईला राष्ट्रमातेचा दर्जा मिळाला पाहिजे–शंकराचार्य

नवी दिल्ली–गाईला राष्ट्रमातेचा दर्जा मिळाला पाहिजे. यासाठी मी पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि राष्ट्रपती द्रोपदी मुरमुरे यांना पत्र लिहिणार आहे असे विधान शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद यांनी केले आहे.

### भाजपाचा स्वबळाचा नारा

मुंबई–भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत कल्याणमध्ये काँग्रेस सह सामाजिक कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश केला. यावेळी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी महापालिका निवडणुका स्वबळावर लढवण्याचे संकेत दिले आहेत.

### १६ वर्षीय अल्पवयीन शाळकरी मुलीचे अपहरण

बीड– नेकनूर पोलीस स्टेशन हद्दीतील एका गावात शाळकरी मुलीचे तीन आरोपींनी चारचाकी गाडीतून अपहरण करत तिचा विनयभंग केला. तसेच प्लास्टिकच्या पाईपने मारहाण केली आणि घडलेला प्रकार कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी नेकनूर पोलिसात फिर्याद देण्यात आली असून पोलिसांकडून अधिकचा तपास सुरू आहे.

### माजी आ. बाबाजानी दुर्रानी काँग्रेसच्या वाटेवर

परभणी–मुंबईत काँग्रेस पक्षात प्रवेश करण्याच्या चर्चा माजी आ. बाबाजानी दुर्राणी यांच्या समर्थकांकडून होत असून दि. ७ ऑगस्टला काँग्रेस पक्षप्रवेशाच्या बॅनर्स समाज माध्यमांवर व्हायरल केले जात आहे. अजितदादांच्या राष्ट्रवादीत प्रवेश रखडल्यानंतर दुर्राणी यांच्या काँग्रेस सोबतच्या भेटीगाठी वाढल्या होत्या. सुरेश वरपूडकर भाजपमध्ये गेल्यानंतर बाबाजानी दुर्रानी यांना काँग्रेसमध्ये मोठी जबाबदारी मिळेल असा अंदाज वर्तवला जात आहे.

### उद्धव ठाकरे ३ दिवसीय दिल्ली दौऱ्यावर

मुंबई : उद्धव ठाकरे ३ दिवसीय दिल्ली दौऱ्यावर जाणार असून दि. ६ ते ८ ऑगस्टदरम्यान ठाकरेंचा दिल्ली दौरा आहे. इंडिया आघाडी बैठकीबाबत राहुल गांधींशी चर्चा करणार असून दिल्लीत इंडिया आघाडीच्या नेत्यांशी घेणार भेट घेणार आहेत.

### शिंदेंची पक्ष म्हणून कारकीर्द संपणार–असीम सरोदे

मुंबई– शिवसेना नाव, पक्ष आणि झेंड्याच्या वादावर सर्वोच्च न्यायालयाकडून लवकरच अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. हा निर्णय कोणाच्या बाजूने जाईल याची चर्चा होत असतानाच आता वकील असीम सरोदे यांनी केलेल्या वक्तव्याने राजकीय भूवया उंचावल्या आहेत. असीम सरोदे यांनी एकनाथ शिंदे यांची पक्ष म्हणून असलेली कारकीर्द महिनाभरात संपेल असा मोठा दावा केला आहे.

### १४ सप्टेंबरला दुबईत भारत–पाकिस्तान मॅच

नवी दिल्ली : आशियाई क्रिकेट काऊन्सिलने आशिया कप २०२५ बाबतचे परिपत्रक जाहीर केले आहे. यानुसार ही स्पर्धा दुबई आणि अबुधाबी या दोन ठिकाणांवर खेळवली जाणार असून आशिया कपमध्ये भारत–पाकिस्तान सामना होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. १४ सप्टेंबरला भारत–पाकिस्तानमध्ये हायव्होल्टेज सामना रंगणार आहे.

# वादळी वाऱ्यासह पाऊस होणार

## प्रादेशिक हवामान केंद्राचा अंदाज; शेतकऱ्यांनी सतर्क राहण्याची गरज

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

**प्रादेशिक हवामान केंद्राने दिलेल्या अंदाजानुसार मराठवाड्यात पुढील तीन दिवस कमाल तापमानात दोन ते तीन अंशांनी घट होईल. तसेच मराठवाड्यातील काही जिल्ह्यामध्ये विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे. अशा वेळी शेतकऱ्यांनी सतर्क राहण्याची गरज आहे.**

जून महिन्यासह जुलै महिन्यात पावसाने मोठा खंड दिला असून काही ठिकाणी दुबार पेरणी करावी लागली आहे.



### पुढील तीन दिवसात पावसाचा कल

४ ऑगस्ट : नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, सोलापूर, धाराशिव, लातूर, नांदेड, ५ ऑगस्ट : वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, ६ऑगस्ट : बीड, परभणी, नांदेड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग

ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या तीन दिवसात सुध्दा पाऊस न झाल्याने शेतकरी चिंतेत आहे. धाराशिव, लातूर आणि नांदेड या तीन जिल्ह्यांसह विदर्भातील ६ जिल्ह्यांना हवामान विभागाने पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. दक्षिण महाराष्ट्रातही हलक्या पावसाची शक्यता आहे. पावसाचा जोर हळूहळू दक्षिण मध्य महाराष्ट्र व कोकणाकडे वाढणार असून पुढील चार दिवस बहुतांश भागात ▶▶ पान २ वर

## निवडणूक कर्मचाऱ्यांच्या मानधनात वाढ होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**भारत निवडणूक आयोगाने मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांचे वार्षिक मानधन दुप्पट करण्याचा तसेच बीएलओ पर्यवेक्षकांचे मानधन वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. याशिवाय, मतदार नोंदणी अधिकारी (इआरओ) आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी ( एईआरओ ) यांना प्रथमच मानधन देण्यात येणार आहे.**

निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार बीएलओचे २०१५ पासूनचे मानधन सहा हजार वरून १२ हजार तर मतदार यादी पुनरावलोकनासाठी बीएलओ प्रोत्साहन रक्कम १ हजार वरून २ हजार रुपये करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे, बीएलओ पर्यवेक्षक यांचे मानधन १२ हजार वरून १८ हजार रुपये करण्यात आले आहे. एईआरओ यांना प्रथमच २५ हजार रुपये तर ईआरओ यांनाही प्रथमच ३० हजार रुपये मानधन देण्यात येईल.याशिवाय, बिहारपासून सुरू झालेल्या या विशेष तीव्र पुनरावलोकन (एसआयआर) मोहिमेसाठी बीएलओंना सहा हजार रुपये इतके विशेष प्रोत्साहन मानधन देण्यात येणार आहे. हा निर्णय निवडणूक प्रक्रियेची अचूकता, पारदर्शकता आणि विश्वासार्हता वाढवण्यासाठी अथक ▶▶ पान २ वर

## एसआयटी प्रमुखांसह पथक बीडमध्ये तळ ठोकून

### महादेव मुंडे हत्या प्रकरणातील तपास गतीने होणार

**बीड । प्रतिनिधी**

**परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांच्या हत्या प्रकरणातील तपासाला आता वेग आला असून एसआयटीचे प्रमुख आयपीएस पंकज कुमावत हे बीडमध्ये दाखल झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. हे पथक बीड जिल्ह्यात तळ ठोकून असून बीड आणि परळीसह काही ठिकाणी जावून तपास करणार आहे.**

महादेव मुंडे यांचा खून होऊन २० महिने झाले तरी आरोपींना अटक करण्यात आले नाही. मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आंदोलने केली, त्यानंतर मुख्यमंत्र्यांची मुंबईत



भेट घेतल्यावर एसआयटीची स्थापना करण्यात आली. एसआयटीचे प्रमुख

#### गोट्या गित्ते सायको किलर–बाळा बांगर

मी सुरुवातीपासून सांगत आलो आहे. गोट्या गित्ते हा सायको किलर आहे. छोट्या गुन्ह्यापासून ते मोठ्या गुन्ह्यापर्यंत त्याचा हात आहे. गोट्या गित्तेला मकोकाखाली अटक करायला पाहिजे होती. मी सांगत होतो त्यावेळेला गोट्या परळीतच होता, असे बाळा बांगर यांनी प्रसार माध्यमाशी बोलताना म्हटले आहे.

#### गोट्या गित्तेला पकडण्याचे आव्हान

दोन दिवसापुर्वी गोट्या गित्तेने एका रेल्वे पटरीवर बसून व्हिडिओ काढून तो समाज माध्यमात व्हायरल केला. त्याची चर्चा मोठी झाली असून विरोधकांकडून गोट्या गित्तेला अटक करण्यासाठी दबाव वाढत आहे. त्यामुळे एसआयटी समोर सुध्दा गोट्या गित्तेसह इतर आरोपींना वेळेत अटक करुन गजाआड करण्याचे आव्हान असणार आहे.

आयपीएस पंकज कुमावत आणि टिम बीडमध्ये दाखल झाले असून हे पथक तळ ठोकून असणार आहे तर महादेव ▶▶ पान २ वर

## बीडमध्ये व्यापाऱ्याला ९ लाखाचा ऑनलाईन गंडा

**बीड । प्रतिनिधी**


**लिंकवर पैसे भरा तीन महिन्यात दाम दुप्पट होईल असे आमिष दाखवून अज्ञात भामट्याने बीडमधील एका व्यापाऱ्याची तब्बल ९ लाख ८८ हजार ५०० रूपयांची फसवणूक केल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी बीडच्या सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.**

बीड शहरातील बार्शी रोडवरील व्यापारी विलास ज्ञानोबा नाईकवाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दोन मोबाईल क्रमांक धारकांविरुध्द सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.दिनांक २० फेब्रुवारी २०२५ ते ३ एप्रिल २०२५ या कालावधीत एका अनोळखी मोबाईल क्रमांकावरून भामट्याने त्यांना फोन केला. ग्लोबल कॅपिटल एफ.एक्स कंपनीच्या लिंकवर पैसे भरल्यास तुम्हाला ०.५ ते १ टक्काव्याज मिळेल आणि तीन महिन्यात त्याचे दामदुप्पट होईल असे आमिष दाखवले. त्यामुळे नाईकवाडे यांनी लिंकवर पैसे टाकले. मात्र परत काहीच न मिळाल्याने ▶▶ पान २ वर

## ना विद्यार्थी ना इमारत तरही पाटोद्यात चालते नर्सिंग कॉलेज

**पाटोदा । प्रतिनिधी**

महाविद्यालयाची परवानगी घेत असतांना ईमारत, क्रीडागन, प्राध्यापक वर्ग याची सहनिशा करूनच मान्यता दिली जाते मात्र नाशिक आविर विद्यापीठाची परवानगी घेतल्याची दाखवत पाटोदा शहरातील बस्थानका समोर बिन बोबाट नर्सिंग कॉलेज असल्याचा भाडा फोड झाला आहे वार्षिक तपासणीसाठी आलेल्या पथकाला ईमारतीशिवाय काहीही आढळून आले नाही. कागदोपत्री असलेले महाविद्यालय एका मिडीकल चालकाने सुरू केले असल्याची माहिती पुढे आली आहे.



पाटोदा शहरातील एका बोगस नर्सिंग कॉलेजची तपासणी नुकतीच करण्यात आली असून पाटोदा शहरात कोणत्याही प्रकारचे नर्सिंग कॉलेज चालू नाही विद्यार्थीही दिसत नाहीत अचानक नर्सिंग कौन्सिल मेंबर मुंबई व मेडिकल कॉलेज अंबेजोगाई चे प्राध्यापक येथून यांनी नर्सिंग कॉलेजची तपासणी केल्याची समजते मात्र हे कॉलेज एका घरातच असून तेथे ना विद्यार्थी ना स्टॉफ कागदावरच कॉलेज असून यांचे इन्फेक्शन दरम्यान शहरातील युवकांनी काढलेले व्हिडिओ व्हायरल होत असून या व्हिडिओमध्ये बरच काही सांगून जात आहे पाटोदा शहरात एका नर्सिंग कॉलेजच्या तपासणीसाठी अचानक नर्सिंग कौन्सिल मेंबर मुंबई व मेडिकल कॉलेज अंबेजोगाई चे प्राध्यापक तपासणीसाठी आले होते मात्र हे कॉलेज कुठे भरते हे त्यांना माहित होते ▶▶ पान २ वर

## वसंतराव नाईक विकास महामंडळाची वेबसाईट होतेय नेहमीच हँग!




**बीड । प्रतिनिधी**

**वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाची वेबसाईट नेहमीच हँग होत असल्याने लाखो इच्छुक लाभार्थ्यांना सुरुवातीच्या टप्प्यावरच अनंत अडचणीचा सामना करावा लागत आहे.**

महाराष्ट्र शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागा अंतर्गत वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, पै. मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ, राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ हे तीन आर्थिक विकास महामंडळे कार्यरत आहेत. सदर महामंडळामार्फत विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागासवर्ग प्रवर्गाच्या तसेच वडार व रामोशी समाजातील आर्थिक ▶▶ पान २ वर

## मनोज जरांगे पाटील व सहकारी लिफ्टसह पहिल्या मजल्यावरून जमिनावर आदळले



**बीड । प्रतिनिधी**

**आपल्या सहकारी नातेवाईकाच्या भेटीसाठी मनोज जरांगे हे आपल्या साथीदारांसह येथील रुग्णालयात गेले होते मात्र यावेळी लिफ्ट मधून जाताना मोठी दुर्घटना घडली हि लिफ्ट पहिल्या मजल्यावरून थेट जमिनीवर आदळली यात कोणालाही काही इजा झाली नाही क्षमतेपेक्षा अधिक वजन झाल्याने हि घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे.**

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील हे एका रुग्णाला भेटण्यासाठी हॉस्पिटलमध्ये आले होते. बीडमधलं शिवाजीराव क्रिटिकल केअर नावाचां हॉस्पिटल आहे. या रुग्णालयात ही घटना घडली आहे. या रुग्णालयाच्या ▶▶ पान २ वर

## आंदोलन करणे हे जिवंतपणाचे लक्षण-सुषमा अंधारे

### मन–मेंदू–मनगट या सर्वबाबी उल्हास गिराम यांच्या बाबतीत परिपूर्ण

**बीड । प्रतिनिधी**

शिवसेना उपनेत्या तथा प्रवक्त्या सुषमाताई अंधारे यांनी आज जिल्हाप्रमुख उल्लास गिराम यांच्या जनसंपर्क कार्यालयास भेट दिली. आगामी निवडणुकी संदर्भात शिवसैनिकांशी सवांद साधला. ज्या ठिकाणी अन्याय, अत्याचार, सामान्य लोकांचे




मूलभूत प्रश्न पायदळी तुडवली जातात तेव्हा लोकशाहीला साजेशी आंदोलने झाली पाहिजेत. शिवसैनिकांना आंदोलनाचे शास्त्र कळले पाहिजे, आंदोलन करणे जिवंतपणाचे लक्षण असल्याचे यावेळी सुषमा ताई अंधारे यांनी शिवसैनिकांना सांगितले.

जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे कौतुक सुषमाताईंनी केले. जिल्हाप्रमुख पदाच्या आजपर्यंतच्या कार्याची माहिती घेतली. शिवसैनिक व जिल्हाप्रमुख ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०२ ऑगस्ट २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५.०० क्विंटल | २,७६८ | २,७६८ | २,७६८ |
| ज्वारी/हायब्रिड : ९.०० क्विंटल | २,३१० | २,७०० | २,५२८ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १.०० क्विंटल | ५,७०० | ५,९०१ | ५,८०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ९.५० क्विंटल | २,५५१ | २,९११ | २,६८५ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ४,६०० | ४,६०० | ४,६०० |
| हरभरा: ९.०० क्विंटल | ५,८१० | ६,१०० | ५,९५५ |

## मुख्यमंत्र्यांनी तंबी देऊनही मंत्र्यांची बडबड सुरुच!





### मंत्री संजय सिरसाटनंतर मेघना बोर्डीकरांची ग्रामसेवकाला धमकी

**परभणी । प्रतिनिधी**

**सत्तेत आल्यापासून महायुतीचे काही मंत्री वादग्रस्त वक्तव्यांमुळे चर्चेत राहिले आहेत. मुख्यमंत्र्यांनी बेताल वक्तव्य करणाऱ्या मंत्र्यांची शाळा घेऊन त्यांना थांबवले होते, तरीही त्यांची बडबड सुरूच आहे. मंत्री संजय सिरसाटनंतर आता राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सभेमध्येच ग्रामसेवकाला झोडपण्याची भाषा वापरली आहे.**

महायुतीच्या सरकारमध्ये सुरुवातीपासूनच मंत्र्यांचे बेताल वक्तव्य सुरु असून माणिकराव कोकाटे यांना तर अशा वायफळ बडबडीमुळे आपले खाते गमवावे लागले आहे. तर इतर मंत्र्यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तंबी देत वादग्रस्त वक्तव्य टाळण्याचा सल्ला दिला आहे.

संजय शिरसाट यांनी सरकारी निधीबाबत वादग्रस्त वक्तव्य केले. वसतिगृहासाठी कितीही निधी मागा, लगेच मंजूर करू. सरकारचा पैसा आहे, ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# एककल्ली तानाशाही भारताच्या मुळावर !

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे अत्यंत लहरी, विक्षिप्त, अविश्वासार्ह व तितकेच माथेफिरू राजकारणी म्हणून प्रसिद्ध आहेत. अमेरिकेच्या अध्यक्षपदावर विराजमान झाल्यापासून ट्रम्प यांच्या या गुणावगुणांचे वारंवार जगाला दर्शन घडत असल्याचे दिसून येते. भारतातून होणाऱ्या निर्यातीवर २५ टक्के वाढीव आयातशुल्क लादण्याचा आणि रशियाशी व्यापार केल्याबद्दल भारताला दंड सुनावण्याची त्यांची घोषणा हा त्याचाच परिपाक मानावा लागेल. भारत आणि रशिया यांच्यात जुना दोस्ताना आहे. मागच्या सात, साडेसात दशकात अनेक सरकारे आली आणि गेली. परंतु, या मैत्रीत कधीही अंतर पडलेले नाही. दुसऱ्या बाजूला भारताने महासत्ता अमेरिकेशीही मैत्र जुळवत दोन देशांतील संबंध अधिकाधिक दृढ करण्यावर नेहमीच भर दिला आहे. पंडित नेहरूंच्या काळापासून चालत आलेल्या भारताच्या तटस्थ धोरणाचाच हा भाग होय. परंतु, देशाचा हा पूर्वापार चालत आलेला दृष्टीकोन समजून घेण्याइतकी प्रगल्भता न दाखवणे, हे ट्रम्प यांच्या लौकिकास साजेसेच म्हटले पाहिजे.

रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धसंघर्ष मागच्या दोन वर्षांपासून सुरू आहे. याला भारताने आपला नैतिक विरोधच दर्शविला आहे. मात्र, या पलीकडे जाऊन भारत अथवा चीनने रशियाकडून तेलखरेदी करू नये, ही ट्रम्प महाशयांची अपेक्षा आहे. ती अवास्तव व अव्यवहार्यच ठरते. परस्परावलंबीत्व हा जगाचा नियम असून, देवाणघेवाण व परस्पर सहचर्यावरच अनेक देशांचा कारभार चालतो. त्याकरिता अनेकदा विसंगती किंवा मतभेद बाजूला ठेवावे लागतात. भारतच नव्हे, तर अनेक देश हेच प्रॅक्टिकल धोरण घेऊन पुढे जातात. त्यामुळे ट्रम्प यांना वाटते म्हणून रशियाकडून लष्करी सामग्री किंवा तेलखरेदी करायची नाही, असे होऊ शकत नाही. तसे पाहिले, तर अमेरिकेनेही आजवर अनेक देशांवर युद्धे लादली आहेत. ट्रम्प सत्तेवर आल्यापासून तर अमेरिकेच्या धोरणामध्ये अधिकच गोंधळ पहायला मिळतो. युद्ध, संघर्ष आणि मध्येच विराम अशा त्रिविध भूमिका ट्रम्प एकाच वेळी निभावताना दिसतात. पण, म्हणून अमेरिकेशी आपण व्यापार थांबवलेला नाही. 'अमेरिकन फर्स्ट' हे ब्रीदवाक्य घेऊन ट्रम्प सत्तेवर आले. तथापि, अमेरिकेशिवाय जग, हाच त्यांचा प्रमुख अजेंडा असल्याचे त्यांच्या वर्तनावरून दिसते. म्हणूनच भारत आणि रशियातील कराराने त्यांची पोटदुखी वाढते. अमेरिकेत भारतीय लोक मोठ्या प्रमाणात स्थायिक आहेत. या देशातील अनेक नगरे, गावे तर निव्वळ भारतीयांनीच गजबजलेली दिसतात. सिलिकॉन व्हॅलीतही भारतीयांचे वर्चस्व पहायला मिळते. स्वाभाविकच भारतीयांबद्दल डोनाल्ड ट्रम्प यांच्या मनात एक आकस आहे. हा आकस, मत्सर त्यांच्या व्हिसा वा तत्सम धोरण, नियमांमधून वारंवार अधोरेखित होत आहे. अमरेकित स्थायिक झालेल्या भारतीयांवर कडक निर्बंध लादणे, त्यातून त्यांच्या नोकऱ्या धोक्यात आणणे व भारतीयांचे स्थलांतर रोखणे, ही अमेरिकेच्या या लहरी राजाची त्रिसूत्रीच म्हणता येईल. त्यासाठीच या ना त्या माध्यमातून ते भारताला त्रास देण्याचा प्रयत्न करत आहेत. अलीकडेच भारत व ब्रिटनमध्ये ऐतिहासिक व्यापारी करार झाला. त्याचाही महासत्तेच्या या नेतृत्वाला पोटशूळ उठला असावा, असे म्हणायला वाव आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या युद्धसंघर्षातील ट्रम्प यांची भूमिकाही संशयास्पद होय. पाकच्या छुप्या हल्ल्याने भारताने चोख प्रत्युत्तर दिल्यानंतर ट्रम्प यांनी युद्धस्थगितीसाठी दिलेल्या धमक्या आणि नंतर सतत आपणच हे युद्ध थांबविल्याचा केलेला दावा यातून ट्रम्प कुठल्या दिशेने चालले आहेत, यावर प्रकाश पडतो. आता तर अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यात तेल व्यापार करार घडवून त्यांनी एकप्रकारे भारताला शह देण्याचा प्रयत्न केला आहे. एक दिवस पाकिस्तान भारताला तेल विकू शकेल, हे त्यांचे विधान म्हणजे भारताला खिजवण्याचाच प्रकार म्हणता येईल.

पाकिस्तान आपल्या किनाऱ्यालगतच्या समुद्रात मोठे तेलसाठे असल्याचा दावा करतो. पण या तेलाच्या उत्खननात त्यांना फार प्रगती साधता आलेली नाही. या पार्श्वभूमीवर या दोन देशात झालेला करार आपल्याला दुर्लक्षून चालणार नाही. तसे अमेरिका पाककडे सरळसरळ झुकत असल्याचेच हे निदर्शक. तथापि, देशातील मनुष्यबळाची ताकद, जगाच्या बाजारपेठेतील आपले स्थान बघता ऊठसूठ भारतविरोधी भूमिका घेणे अमेरिकेलाही महागात पडू शकते. अर्थात ट्रम्प यांच्या टॅरिफचा एकूणच भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम होणार, हे निश्चित असेल. हा टॅरिफ अपेक्षेपेक्षा जास्त असल्याने देशाच्या जीडीपी वाढीला फटका बसू शकतो, असे तज्ञ म्हणतात. शिवाय देशाच्या निर्यातीवरही त्याचा नकारात्मक परिणाम होण्याची चिन्हे आहेत. अर्थात हा टॅरिफ बॉम्ब अमेरिकेवर उलटण्याची शक्यताही नाकारता येणार नाही. अमेरिका औषधांसाठी मोठ्या प्रमाणावर भारतावर अवलंबून आहे. जगाला स्वस्त व चांगल्या दर्जाची औषधे भारत पुरवतो. टॅरिफमुळे औषधे महागली, तर त्याची झळ अमेरिकन नागरिकांना बसू शकेल. स्वाभाविकच ट्रम्प यांना भारताविरोधात वापरलेले हत्यार हे दुधारी आहे. त्यामुळे दीर्घकालीन हेच धोरण कायम ठेवणे, त्यांच्याकरिताही अवघड असेल. भारतातील करदरावर ट्रम्प यांचे आक्षेप आहेत. हा गुंता एकत्र बसून सोडविता येऊ शकतो. त्याकरिता दोन देश पुढच्या टप्प्यात सकारात्मक भूमिका घेतील का, हेही पहावे लागेल. मीच जगाचा बादशहा, मीच तारणकर्ता, अशा पद्धतीने डोनाल्ड ट्रम्प यांचा कारभार सुरू आहे. तथापि, अशा एककल्ली पद्धतीने महासत्ता डॉनगिरी करण्यात धन्यता मानू लागली, तर त्यातून संपूर्ण जगाचे अर्थकारण बिघडण्याचा धोका संभवतो. ट्रम्प रशियाबरोबरच भारताचा उल्लेखही मृत अर्थव्यवस्था असा करतात. त्यांचा हा विचार किती संकुचित आणि खोटा आहे, हे आगामी काळात भारताला दाखवून द्यावे लागेल.

# पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त ३००० वृक्षांची भेट; बीडमध्ये घनवनाचा प्रेरणादायी उपक्रम

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील घाटसावळी येथील सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत फड यांनी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त एक अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. पर्यावरण संवर्धनासाठी त्यांनी आपल्या स्वमालकीच्या जमिनीवर घनवन पद्धतीने तब्बल ३००० हजार वृक्षांची लागवड करून एक सजीव जंगल निर्मितीचा संकल्प केला आहे.या वृक्षारोपणामध्ये पिंपळ, वड, कांचन, अडुळसा, मेहंदी, इंग्रजीचिंच, कडूलिंब, करंज, सिताफळ, शंकेश्वर, हातगा, बेल, शेवगा, काटेसावर, सिसम, चिंच, कवटउंबर, तुळस, कढीपत्ता, आवळा, आपटा, गावठी आंबा, रातराणी, कनेर, जास्वंद, बांबू, तुती, कोरफड अशा स्थानिक आणि उपयोगी वनस्पतींचा समावेश करण्यात आला आहे. हे संपूर्ण रोपण स्थानिक सामाजिक वनीकरण, वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली व वनस्पती संशोधकांच्या सल्ल्याने यात प्रा. पाटील अरुण, वनपाल मोरे, वनरक्षक केदार, बांगर मॅडम, सुरवसे मॅडम, सत्य वृक्ष पूजा रचनाकार महेश खरे, डोमरी गुरुकुल मुख्याध्यापक चव्हाण अण्णा यांच्या सहकार्याने करण्यात आले आहे.या उपक्रमाच्या निमित्ताने वृद्धाश्रमातील वृद्ध व्यक्तींना स्नेहभोजन, आरोग्य तपासणी आणि विविध सेवा कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आले.**



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष शिवाजीराव फड तर प्रमुख उपस्थिती म्हणून भाजपा राज्य कार्यकारणी सदस्य सर्जेराव तांदळे, भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम भाई जहांगीर, प्रदेश उपाध्यक्ष अनिल चांदणे, बीड शहराध्यक्ष अशोक लोढा, बीड ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष मनोज पाटील, बालाघाट मंडळाचे अध्यक्ष अशोक रसाळ, वडवणी मंडळ अध्यक्ष सुखदेव रेडे, विलास मोमीन, रिपाई नेते सुभाष तांगडे, मा. सरपंच नागेश शिंदे, प्रा. तिडके तेजस, विठ्ठल शिंदे, विलास बामणे, संजय काळे, अमोल वडतीले, हरीश खाडे, आप्पासाहेब झोडगे, नरेश पवार, महादेव नागरगोजे, अशोक घोडके,वामन मुंडे,बाळासाहेब हावळे, अशोक मुंडे, सटवाभाऊ मुंडे, वचिष्ट मुंडे, सोमनाथ मुंडे, गोरख मुंडे, नारायण मुंडे, अशोक घिगे, बाबासाहेब शिंदे, शाम राऊत, अशोक वैद्य, अंगद देवडकर, सचिन तीपटे, विशाल वाघमारे, गोरख बाबर, सुन्दर लांडे, रमेश लांडे, गाडे, मुलानी, बडे, विठल लांडे, उजगरे, संजय फड जावळे, मुळे, सूत्र संचलन अजिनाथ शेरकर यांनी केले यांच्या सह कार्यक्रम संपन्न करण्यासाठी ज्यांनी परिश्रम घेतले असे सुबोध फड, कृउबास संचालक नितीन फड, संतोष खवतड, बारीक कडेकर, महेश खवतड,बाबू फड बीड विधानसभेतील सर्व नूतन पदाधिकारी यांचा स्वागत समारंभ आयोजित केला होता. समाजाच्या सर्व थरातील नागरिकांना एकत्र आणून पर्यावरण संरक्षणाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचा एक उत्कृष्ट नमुना या उपक्रमातून साकारण्यात आला आहे. चंद्रकांत फड यांचे सामाजिक योगदान केवळ पर्यावरणापुरते मर्यादित नसून, ते तरुणांना व्यसनमुक्त ठेवण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करतात तसेच गोरगरिबांना मदत, सुसंस्कृत आणि जागरूक तरुण घडविण्याच्या कार्यातही सक्रियपणे सहभागी असतात. त्यांच्या पुढाकाराने बीड जिल्ह्यातील बालाघाट डोंगररांग हिरवीगार करणे हे एक मोठे स्वप्न असून, त्यासाठी त्यांनी अनेक शासकीय, सामाजिक आणि राजकीय स्तरावर पाठपुरावा सुरू केला आहे. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी विविध योजनांची माहिती पोहोचवणे, बांबू प्रकल्पास प्रोत्साहन, तसेच आई-वडिलांची सेवा करण्याविषयी मार्गदर्शन हे त्यांचे ठळक कार्यक्षेत्र आहे. ते सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात नेहमी अग्रभागी असतात, आणि बीड जिल्ह्यातील अनेक तरुणांचे प्रेरणास्थान ठरले आहेत. या घनवन प्रकल्पाच्या माध्यमातून चंद्रकांत फड यांनी केवळ पर्यावरण रक्षणासाठीच नव्हे, तर समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी एक प्रभावी पाऊल उचलले आहे.

# कैलास गोरंट्याल यांनी पक्ष सोडल्यामुळे काँग्रेस पक्षावर कोणताच परिणाम होणार नाही-खा. डॉ. कल्याण काळे

**जालना । प्रतिनिधी**

**जालन्यातील काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यावर पक्षाने कोणताही अन्याय केलेला नसून ते पक्षाचे विद्यमान आमदार असल्यामुळे पुन्हा एकदा जालन्यातून त्यांनाच संधी दिली गेली. त्यामुळे नाव पहील्या यादीत आले काय किंवा शेवटच्या यादीत आल्याने कोणताही फरक पडत नाही, केवळ पक्ष सोडताना काहीतरी कारण पाहीजे म्हणून श्री. गोरंट्याल यांनी भाजपात प्रवेश करण्यापूर्वी काँग्रेस पक्षावर आरोप केले असा दावा जालन्याचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आज पत्रकार परिषदेत केला. जालना जिल्हा काँग्रेसच्या महत्वाच्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. काळे पुढे म्हणाले.**



सोडला तरी त्यामुळे काँग्रेस पक्षावर कोणताही परिणाम होणार नरकू याउलट अनेकजण आता काँग्रेस पक्षात प्रवेश करणार असल्याची माहीती खा. काळे यांनी यावेळी दिली. आऊट गोइंग नव्हे तर यापुढे काँग्रेसमध्ये इनकमिंग दिसेल असा दावाही श्री. काळे यांनी केला. अगदी सुरुवातीलाच खा. काळे म्हणाले, श्री. कैलास गोरंट्याल हे काँग्रेस सोडणार असल्याची चर्चा माझ्यावर कानावर येताच मी त्यांच्या निवासस्थानी जावून त्यांना पक्ष सोडू नका अशी विनंती केली. मात्र, यावेळी श्री. गोरंट्याल यांनी आता मी फार पुढे गेलो आहे आणि अन्य पक्षात जाण्याचा माझा निर्णय पक्का झाला असल्याचे सांगितल्यामुळे मी हतबल झाल्याचे सांगून खा. काळे पुढे म्हणाले आजपासून जालना जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचे संघटन बांधण्याच्या कामाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली आहे. परवाच राज्याचे प्रदेशाध्यक्ष श्री. हर्षवर्धन सपकाळ यांनी जालन्यात येवून जिल्ह्यातील पूर्ण आठही तालुक्यांचा आढावा घेतला असता कोणत्याही तालुक्यातील कोणताही महत्वाचा नेता किंवा कार्यकर्ता काँग्रेस पक्षातून बाहेर पडला नसल्याचे स्वतः श्री. सपकाळ यांच्या निदर्शनास आले असे सांगून खा. काळे म्हणाले, जिल्ह्यातील जनता पूर्णपणे काँग्रेससोबत असून यापुढे सर्वांना सोबत घेवून एक मजबुत संघटना बांधणीचे काम जोमाने सुरू ठेवण्यात येईल असे ते म्हणाले. काँग्रेस पक्षाने श्री. गोरट्याल यांना तिकीट दिले आणि वाऱ्यावर सोडले असा आरोप केल्याबद्दल खा. काळे म्हणाले, एखाद्या उमेदवाराला तिकीट दिल्यानंतर पक्षाने त्याच्यावर अन्याय केला असे म्हणणे चुकीचे आहे. तसेच विद्यमान आमदार असल्यामुळे त्यांचे तिकीट निश्चित होते त्यामुळे ते पहील्या यादीत जाहीर केले किंवा शेवटच्या यादीत जाहीर केले यामुळे फारसा फरक पडत नाही असे सांगून खा. काळे म्हणाले, आता पक्ष सोडताना काहीतरी जनतेला सांगावे लागेल म्हणुन ही पळवाट श्री. गोरंट्याल यांनी शोधली असावी असा आरोपही डॉ. काळे यांनी केला. या पत्रकार परिषदेला आ. राजेश राठोड, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष श्री. राजाभाऊ देशमुख, प्रदेश उपाध्यक्ष श्री. राजेंद्र राख, माजी शहराध्यक्ष श्री. अब्दुल हाफिज, परतूरचे अन्वर देशमुख आदींची उपस्थिती होती. तत्पूर्वी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जुना जालना भागातील टाऊन हॉल येथून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात पक्षाचा मेळावा घेण्यात आला.

# शेतकऱ्यांची आडचण: पोर्टलवर सातबार सापडेना

**बीड । प्रतिनिधी**

**२०१९ नंतर जमीन फेरफार करून नवीन सातबारा अनेकांनी मिळवले आहेत. मात्र अशा शेतकऱ्यांचे सातबारा ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध नसल्याने त्या शेतकऱ्यांना पीक विम्यासह महाडीबीटी सारख्या अन्य सरकारी योजनांचा लाभ घेता येत नसल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी वेळोवेळी प्रशासन दरबारी तक्रार करूनही शेतकऱ्यांचे सातबारा ऑनलाईन पोर्टलवर उपलब्ध होत नाही. शासनाने याची गंभीर दखल घ्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.**

बीड जिल्ह्यातील अनेक शेतकरी पीक विमा योजनांपासून वंचित राहत आहेत. नुकतीच पीक विमा भरण्याची अंतिम तारीख संपली असून, ज्या शेतकऱ्यांनी २०१९ नंतर जमीन फेरफार करून नवीन सातबारा मिळवले आहेत, अशा शेतकऱ्यांचे सातबारा उतारे ऑनलाइन पोर्टलवर अद्यापही उपलब्ध नाहीत. या तांत्रिक त्रुटींमुळे अशा शेतकऱ्यांना नुसतेच पीक विमा नव्हे, तर महाडीबीटीसारख्या इतर सरकारी योजनांचाही लाभ घेता येत नाही. अनेक वेळा निवेदन देऊनही प्रशासनाने या समस्येकडे दुर्लक्षच केले आहे. शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सातबारा ऑनलाइन दिसत नसल्यामुळे त्यांचा शेतकरी म्हणून अधिकृत पुरावा उपलब्ध राहत नाही, आणि त्यामुळे विमा कंपन्या अज स्वीकारत नाहीत.या परिस्थितीमुळे हजारो शेतकरी आर्थिक संरक्षणाशिवाय उघडे पडले असून, शासनाने याकडे तात्काळ लक्ष देण्याची गरज आहे.

# आ. राठोड यांची काँग्रेस प्रदेश महासचिवपदी फेरनिवड

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य आ. राजेश राठोड यांची काँग्रेस पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश महासचिवपदी फेरनिवड करण्यात आली आहे. ही नियुक्ती अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे जनरल सेक्रेटरी खासदार के सी. वेणुगोपाल यांनी अधिकृतपणे जाहीर केली. या नियुक्तीनंतर आ. राठोड यांनी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, राष्ट्रीय अध्यक्ष मल्लीकार्जुन खरगे, विरोधी पक्षनेते राहुल गांधी, महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नीथला, जनरल सेक्रेटरी के सी. वेणुगोपाल, प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधिमंडळ काँग्रेस गटनेते विजय वडेट्टीवार, विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील, बाळासाहेब थोरात आणि आ. अमित देशमुख यांचे मनःपूर्वक आभार मानले. या फेरनियुक्तीमुळे मंठा तालुक्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानीय कार्यकर्त्यांनी फटाके फोडून व पेढे वाटून जल्लोषात हा निर्णय साजरा केला. राजेश राठोड हे ओबीसी समाजाचे प्रभावी नेतृत्व असून, त्यांच्या संघटन कौशल्यामुळे पक्षात त्यांना विशेष मानाचे स्थान आहे. त्यांनी विविध आंदोलनांमध्ये सक्रिय सहभाग घेतला असून, ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांमध्ये त्यांचा मजबूत संपर्क व जनाधार आहे.



## पान १ वरून...

### वादळी वाऱ्यासह

हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची हजेरी लागणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. प्रादेशिक हवामान केंद्राने दिलेल्या अंदाजानुसार कोकण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात पुढील तीन दिवस कमाल तापमानात दोन ते तीन अंशांनी घट होईल. बहुतांश ठिकाणी ढगाळ वातावरण असेल. हलक्या व मध्यम पावसाची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यात काही जिल्ह्यांमध्येहलक्या सरींची शक्यता असून तळ कोकण व दक्षिण महाराष्ट्रात पावसाचा जोर हळूहळू वाढणार आहे. तर काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे.

---------

### एसआयटी प्रमुखांसह पथक

मुंडे हत्या प्रकरणातील आरोपींचा जोपर्यंत छडा लागत नाही, तोपर्यंत पंकज कुमावत हे बीड आणि परळीत २४ तास असण्याची शक्यता आहे. त्यांच्यासोबत पोलीस निरीक्षक संतोष साबळे आणि पोलीस निरीक्षक भार्गव सपकाळ हे देखील असणार आहेत. एसआयटी पथक बीडमध्ये दाखल झाल्याने तपास गतीने होण्याची शक्यता असून वेळेत आरोपींना अटक करण्याचे आव्हान असणार आहे.

----------

### निवडणूक कर्मचाऱ्यांच्या

परिश्रम करणा-या कर्मचा-यांना योग्य मानधन देण्याच्या वचनबद्धतेचे प्रतीक असल्याचे भारत निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

--------

### वसंतराव नाईक विकास महामंडळाची

दृष्ट्या दुर्बल घटकातील व्यक्तींना सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक उन्नतीकरिता विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. यासाठी महामंडळाच्या या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरून कागदपत्रे अपलोड करावी लागतात. त्यानंतर पुढील प्रक्रिया सुरू होते. मात्र, महामंडळाच्या योजनांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या राज्यातील लाखो लाभार्थ्यांना वेबसाईट नेहमीच हँग होत असल्याने सुरुवातीलाच अनंत अडचणीचा सामना करावा लागत आहे. वेबसाईटवरील आपल्या प्रोफाइलमध्ये लॉग- इन करण्यासाठी वन टाईम पासवर्ड (ओटीपी) ची सुविधा दिली आहे. परंतु, तासनतास प्रयत्न करूनही भ्रमणध्वनीवर ओटीपी येतच नाही. कधी कधी डिफॉल्ट ओटीपी आधारे लॉग इन तर होते पण कागदपत्रे अपलोड होत नाहीत. लाख प्रयत्नांती अपलोड झालीच तर सबंधित अधिकाऱ्यांच्या डेस्कवर दिसत नाहीत. परिणामी राज्यातील लाखो इच्छुक लाभार्थ्यांना विविध योजनांपासून वंचित राहावे लागत आहे. वसंतराव नाईक महामंडळासाठी गीता इन्फोटेक प्रा.लि. इंडिया या मुंबई स्थित कंपनीने सदर वेबसाईट तयार केली असून, देखभाल दुरुस्तीची जबाबदारीही त्यांच्यावरच आहे. या समस्येबाबत महामंडळाच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली असता लाभार्थी कर्ज परतफेडीचा तपशील अपलोड करत असल्याने वेबसाईट हँग होत आहे असे सांगण्यात येते. त्यामुळे वेबसाईट हाताळण्याचे कंत्राट दिलेल्या कंपनीच्या कार्य क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. सदर अकार्यक्षम कंपनीच्या कामाची वरिष्ठ पातळीवर चौकशी करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी लाभार्थी वर्गातून करण्यात येत आहे.

-------------

### ना विद्यार्थी ना इमारत तरही

का नव्हते याबाबत काही कळाले नाही मात्र एका घरात जाऊन हे कॉलेज आहे असे दाखवण्यात आले असून या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा स्टाफ नसून एकही विद्यार्थी नाही कॉलेजवर येते नाही फक्त कागदपत्रे विद्यार्थ्यांचे कॉलरशिप उचलण्याचा डाव आहे दुसऱ्या दिवशीही परत इन्फेक्शन ला आले होते मात्र पुढे काय झाले हे समजले नाही याबाबत आंबेजोगाई येथे . संपर्क साधला असता संबंधिताने उडवा-उडीची उत्तरे दिली आहेत या इन्फेक्शन दरम्यान शहरातील लोकांनी काढलेले व्हिडिओ संबंधित आणि आमदार सुरेश धस यांना पाठवला असून या बोगस नर्सिंग कॉलेजची चौकशी करण्यात यावी अशी मागणी शहरातील युवकांमधून होत आहे नेमके हे कॉलेज कुठे आहे हे चर्चा शहरात सुरू आहे.

----------

### बीडमध्ये व्यापाऱ्याला ९

आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. तब्बल ९ लाख ८८हजार ५०० रूपयांची ऑनलाईन व रोख आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी अज्ञात भामट्याविरुध्द सायबर पोलिस ठाण्यात कलम ३१८ (४), ३ (५) भारतीय न्याय संहिता सह कलम माहिती तंत्रज्ञान कायदा २०० चे ६६,६६ (डी) प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोनि.घोळवे करीत आहेत पोलिसांकडून अनोळखी लिंकवर क्लिक करू नका फसवणूक होऊ शकते असे आवाहन अनेकदा करण्यात येते मात्र नागरिक याकडे दुर्लक्ष करत असल्याने अश्या घटनात वाढ होताना दिसत आहे.

---------

### आंदोलन करणे हे जिवंतपणाचे

म्हणून मन - मेंदू - मनगट या सर्व बाबी उल्हास गिराम यांच्या बाबतीत परिपूर्ण असल्याचे ताईंनी सांगितले. दर वेळी हमारीतुंबरी वर येऊन शिवसैनिकांनी काम न करण्याचा सल्ला ही शिवसैनिकांना या वेळी सुषमा ताई अंधारे यांनी दिला. नळ-गटार-रस्ते या तीन कामावर लक्ष केंद्रित करून आंदोलने करा. या पूर्वी संपूर्ण मराठवाड्यात आपण पाणी प्रश्नावर आंदोलने केली यांची दखल या सरकारला घ्यावी लागली असल्याचे ताई म्हणाल्या. यावेळी जिल्हाप्रमुखासह शिसैनिकांनी ताईचा आदर सत्कार केला. यावेळी ज्येष्ठ शिवसैनिक तथा माजी पं. स. विलास महाराज शिंदे, महिला संघटिका मीराताई नवले, जिल्हा संघटक संजय महाद्वार,जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, जिल्हा संघटक नितीन धांडे, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे,उपजिल्हाप्रमुख अजिनाथ खेडकर,तालुकाप्रमुख सोपान काका मोरे, केज तालुकाप्रमुख अशोक जाधव, कामगार सेनेचे रवि वाघमारे, माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे, पंकज कुटे, उपसरपंच प्रदीप कोटुळे, गणेश लोणकर, राजाभाऊ हुरकुडे, दादा साहेब सोनवणे, सतीश परदेशीं, दिलीप पवार

---------------

### मनोज जरांगे पाटील व सहकारी लिफ्टसह

पहिल्या मजल्यावर असलेल्या एका रुग्णाला भेटण्यासाठी मनोज जरांगे पाटील जात होते. मात्र मनोज जरांगे पाटील हे आपल्या सहकाऱ्यांसह लिफ्टने पहिल्या मजल्यावर जाताच लिफ्ट अचानक बंद झाली, आणि ती पहिल्या मजल्यावरून थेट ग्राऊंड फ्लोअरला येऊन आदळली. जेव्हा हा अपघात झाला तेव्हा त्या लिफ्टमध्ये मनोज जरांगे पाटील यांच्यासह त्यांचे काही सहकारी देखील होते, त्या सर्वांना लिफ्टचा दरवाजा तोडून बाहेर काढण्यात आलं.क्षमतेपेक्षा अधिक वजन झाल्याने हि घटना घडली मात्र काही माध्यमांनी हा मोठा अपघात मोठी दुर्घटना म्हणून त्याला रंग दिला गेला या घटनेत कोणालाही काही इजा झाली नाही त्यांच्या समवेत मंगेश पोकळे गंगाधर काळकुटे यांच्यासह १० ते १२ जण होते.

-----------

### मुख्यमंत्र्यांनी तंबी देऊनही

आपल्या बापाचं काय जातंय? असे शिरसाट अकोल्यातील एका कार्यक्रमात म्हणाले. दुसरीकडे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकरांनी भर सभेमध्ये ग्रामसेवकाला कानाखाली वाजवण्याची धमकी दिली. रोहित पवारांनी हा व्हिडिओ ट्विट केला. यावर बोर्डीकरांनी स्पष्टीकरण दिले की, ग्रामसेवक विधवा, मोलमजुरी करणाऱ्या महिलांचा छळ करत होता आणि ज्या भाषेत त्याला कळते, त्याच भाषेत समज दिली. अर्धवट व्हिडिओ बघून जनतेची दिशाभूल करू नये, असेही त्यांनी म्हटले आहे. मंत्र्यांच्या बेताल विधानांमुळे विरोधकांनी सरकारला घेरले आहे.

**मंत्री कधी कधी गमतीने बोलतात-फडणवीस**

मंत्री आपल्या भाषणामध्ये कधीकधी गमतीने देखील बोलतात, प्रत्येक गोष्टीचा आपण बाऊ करु लागलो तर हे योग्य नसल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. काही स्टेटमेंट महत्त्वाचे असतात तर काही चुकीची असतात, असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी मंत्री संजय शिरसाट आणि मंत्री मेघना बोर्डीकर यांच्या वक्तव्यासंदर्भात विचारलेल्या प्रश्नावर प्रतिक्रिया दिली आहे.

------------------------------

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. ४ ऑगस्ट २०२५





अंबड : कर्जत येथे अण्णाभाऊ साठे जयंती साजरी करण्यात आली यावेळी श्रद्धा काळुंके, रोहिनी काळुंके, रुपाली काळुंके, राज काळुंके, अभिषेक काळुंके ,विराट काळुंके ,सम्राट काळुंके या विद्यार्थ्यांनी लोक शाहीर आण्णा भाऊ साठे यांच्या १०५ जयंती निमित्त मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ राहुल पाटील डोंगरे हे होते यांच्यासह सर्व गावकरी हे उपस्थित होते.

## थोडक्यात....

### सहकार पुरस्कारासाठी १८ ऑगस्टपूर्वी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

बीड : राज्यातील सहकारी चळवळीमध्ये उत्कृष्ट योगदान देणाऱ्या सहकारी संस्थांना राज्य सरकारमार्फत सन २०२३-२०२४ करिता सहकार पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. बीड जिल्हा कार्यक्षेत्रातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांनी या पुरस्कार प्रक्रियेत सहभागी व्हावे. त्यासाठी सहकारी संस्थाचे मुख्यालय असलेल्या तालुका सहायक निबंधक सहकारी संस्था यांच्याकडे दिनांक १८ ऑगस्ट २०२५ पूर्वी दाखल करण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक (बीड) सतिश तोटावार यांनी केले आहे. सहकार क्षेत्रात कार्यरत संस्थांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीकरिता प्रोत्साहित करण्यात येत असून, बीड जिल्हा उपनिबंधक कार्यालयात आत्तापर्यंत ११ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी बिगरशेती पतसंस्था व पगारदार नोकरांच्या पतसंस्था ११, नागरी सहकारी बँका, गृहनिर्माण संस्था, ग्राहक संस्था इतर समावेश आहे. सहकारी संस्थांना राज्य सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या सहकार पुरस्कारांची संख्या पुढीलप्रमाणे आहे. सहकार महर्षी पुरस्कार १, सहकार भूषण पुरस्कार २१, सहकारनिष्ठ पुरस्कार २३. या पुरस्कारांच्या सादरीकरणासाठी आवश्यक निकष व गुणांकन प्रक्रिया सहकार आयुक्तालयाच्या :///.-.. या संकेतस्थळावरील मुखपृष्ठावरील महत्वपूर्ण कार्यक्रम या टॅबवर पुरस्कार व कामगिरी येथे उपलब्ध आहे. पुरस्काराद्वारे आपल्याला सर्वसामान्य जनतेसमोर, सहकारी क्षेत्रातील अन्य संस्थांसमोर आपली कामगिरी सादर करण्याची संधी मिळेल व संस्थांना अधिक भरीव योगदान करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

### मुगगाव येथे भोलेश्वर यात्रेचे आयोजन-भवर

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील मुगगाव येथील भोलेश्वर भवरदरा मंदिरात श्रावण महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी, पारंपरिक उत्साहात वार्षिक यात्रा पार पडणार आहे. यानिमित्ताने तालुक्यातील तसेच परिसरातील भाविक भक्तांनी या यात्रोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे तालुका उपाध्यक्ष पत्रकार अशोक भवर यांनी केले आहे.



हे मंदिर पश्चिम दिशेला स्थित असलेल्या स्वयंभू व जागृत शिवमंदिरांपैकी एक मानले जाते. भवरदरा डोंगराच्या कुशीत, मुगगावपासून सुमारे एक किलोमीटर अंतरावर वसलेले हे प्राचीन शिवस्थान आजही भाविकांचे श्रद्धास्थान ठरले आहे. महादेवाची स्वयंभू पिंड, नंदी, पुरातन शिल्पशैली, निसर्गरम्य वातावरण आणि आजूबाजूचे उंच डोंगर यात्रेच्या आकर्षणात भर घालतात. श्रावण महिन्यात महादेवाच्या दर्शनासाठी राज्यभरातून लाखो भाविक मंदिरांमध्ये गर्दी करत असतात. त्याच धर्तीवर मुगगावची यात्रा देखील मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने साजरी केली जाते. यात्रेदिवशी डोंगरात असलेल्या या मंदिरात भाविकांचे मन प्रसन्न करणारे वातावरण, ठिकठिकाणी छोटे धबधबे, हिरवळ आणि शांतता अनुभवता येते. यात्रेदिवशी हजारो भाविक या ठिकाणी दर्शनासाठी गर्दी करतात. भोलेश्वर हे देवो के देव महादेवाचे जागृत स्थान असून, येथे आलेल्या भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात, असा भाविकांचा ठाम विश्वास आहे. हा निसर्गरम्य, आध्यात्मिक व ऐतिहासिक वारसा लाभलेला जागरूक देवस्थान म्हणून भवरदरा मंदिर ओळखले जाते. यात्रेच्या दिवशी भक्तांनी नक्कीच या ठिकाणी भेट देऊन आध्यात्मिक समाधान घ्यावे, असे आवाहन पत्रकार अशोक भवर यांनी केले आहे.

# बँकेसमोरील पुरातन विहीर बुजवण्याच्या विरोधात ४ दिवसांपासून आमरण उपोषण

## अन्यथा मलाच उपोषणाला बसावे लागेल-खा.बजरंग सोनवणे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील महाराष्ट्र बँकेशेजारी जुनी पुरातन विहीर अनेक वर्षापासून होती. ही विहीर नगर परिषदेने बुजवुन त्याठिकाणी अनाधिकृतपणे गाळे बांधकाम करुन ते भाडेतत्वावर दिलेले आहेत. सदरील जागेवरील अतिक्रमण काढून विहीर मोकळी करुन विहीर पुर्वरत सुरु करावी या मागणीसाठी नगरपालिके समोर लोकजनशक्ती पार्टीच्या कार्यकर्त्यांनी उपोषण सुरु केले आहे. या उपोषणास खा. बजरंग सोनवणे यांनी रविवार भेट दिली.

महाराष्ट्र बँकेसमोर असलेली विहीर बुजवून त्याठिकाणी सुरु केलेले गाळे बंद करुन विहीर मोकळी करण्यासाठी नगर पालिकेला निवेदन देण्यात आले होते. तसेच सर्व अंबाजोगाई शहरामध्ये भिक मांगो आंदोलन करण्यात आले होते. परंतु नगर परिषदेने याची दखल न घेता सदर अतिक्रमण अद्यापपर्यंत काढलेले नाही. या विरोधात लोकजनशक्ती पार्टी युवक आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक बन्सी काळे पाटील यांनी मागील ४ दिवसांपासून आमरण उपोषण सुरु केले आहे. मागील चार दिवसापासून तोडगा निघाला नसल्याने आमरण उपोषण सुरुच आहे. नगरपालिकेचे लेखी आश्वासन, परंतू उपोषण सुरुच खा. बजरंग सोनवणे यांनी उपोषण स्थळी भेट दिल्यानंतर नगरपालिकेच्या वतीने स्वच्छता निरीक्षक अनंत वेडे यांनी उपोषण कर्ते अशोक बन्सी काळे पाटील यांना मुख्याधिकरी यांनी दिलेले लेखी पत्र दिले. परंतू दिलेल्या पत्रात विहीरीवरील अतिक्रमण काढणार म्हणून ठोस आश्वासन दिलेले नाही. यामुळे उपोषण मरेपर्यंत सुरु राहील असे उपोषणकर्ते काळे यांनी लेखी दिले आहे.



### खा. बजरंग सोनवणे यांची उपोषण स्थळी भेट

पुरातन वारसा असलेल्या विहिरीच्या जपणुकीसाठी सुरु असलेला हा लढा अत्यंत महत्त्वाचा आहे. लोकशाही मार्गाने प्रश्न मांडणाऱ्या प्रत्येकाच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहीले पाहीजे हे ओळखून खा.बजरंग सोनवणे यांनी उपोषण कर्ते अशोक बन्सी काळे पाटील यांची उपोषण स्थळी जाऊन चौकशी केली. यावेळी खा. सोनवणे यांच्या बरोबर माजी आ. पृथ्वीराज साठे, राष्ट्रवादी गटाचे तालुकाध्यक्ष अमर देशमूख, लोकजनशक्ती पार्टीचे राजेश वाव्हुळे, इस्माईल गवळी, मदनलाल परदेशी, रवी देशमुख, हमीद चौधरी, गणेश घाडगे इत्यादी उपस्थित होते.

## जिल्ह्यात जमावबंदी आदेश लागू

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, यासाठी महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) कलम ८ ऑगस्ट २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू करण्यात आले आहे. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणुका व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकीस लागू राहणार नाही व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजुरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अंमलात राहणार नाही. तसेच या आदेशाचे पालन करुन कोणाताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूवर्मान्यता घेणे आवश्यक असेल असेही आदेशात अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी नमूद केले आहे.

## साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे जयंती साजरी



परतुर । प्रतिनिधी

१ ऑगस्ट रोजी दैठणा (बु.) येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली, यावेळी दैठणा (बु.) येथील सर्व समाज बांधव तसेच गावातील इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते, यावेळी अण्णाभाऊ प्रेमी श्री शामराव नाना चव्हाण दत्ता भदर्गे, भागवत कवडे, ज्ञानेश्वर भोकरे, भीमराव मिसाळ, लिंबाजी दैठणकर, शिवाजी भदर्गे, सुखदेव घोडे, दत्ता घोडे, सोपान घोडे, गौतम भदर्गे, भोनजी घोडे, अशोक दैठणकर, लक्ष्मण बेरगुडे, गणेश कणसे, लहान आप्पा मखमले, विठ्ठल घोडे, किसन घोडे, राहुल भदर्गे, ज्ञानेश्वर घोडे, गजानन वखरे, रामप्रसाद मिसाळ, प्रल्हाद भदर्गे, आदी मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## पान ४ वरुन...

### वैराग्याचे मूर्तिमंत उदाहरण

तुम्हाला जिवंत देव पाहायचं असेल तर गोरक्षनाथ टेकडी येथे गुरुवर्य शांतीब्रह श्री नवनाथ बाबा महाराज हे होय आयुष्यात संसार, प्रपंच या सर्वांचा त्याग करून वैरागी आयुष्य माणसाने जगाव या कलियुगात वैराग्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज हे होय असे प्रतिपादन श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह मध्ये प्रथम कीर्तन पुष्प अर्पण करताना समाज प्रबोधकार निवृत्ती महाराज इंदोरीकर यांनी केले. श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताहास टेकडी परिसरातील भाविक भक्तांनी प्रचंड गर्दी केली या वेळी साधू संताच्या सोबत राजकीय, सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

### भीमराव धोंडे यांच्या

योगदान देण्याचा आम्हाला अभिमान आहे असेही त्यांनी सांगितले. रक्तदान शिबिर आयोजनाचे हे महाविद्यालयाचे ९ वे. वर्ष आहे. मानवता आणि उदारतेच्या या कार्यात सहभागी व्हावे असेही आवाहन केले आहे.इतरांच्या जीवनात बदल घडवून आणून हा खास दिवस साजरा करण्यासाठी आपण एकत्र येऊया.तुमचा सहभाग आमच्या समुदायासाठी प्रोत्साहन आणि आधाराचा एक उत्तम स्रोत असेल.ग्रामीण जागरूकता कार्यानुभव आणि कृषी-औद्योगिक संलग्नता (ठ-थए -ख-) चे कार्यक्रम समन्वयक प्रा.आय.एम.तांबोळी यांनी नियमित रक्तदानाची गरज अधोरेखित केली. रक्ताची मागणी सतत असते आणि एकच रक्तदान अनेक जीव वाचवू शकते.एक सामाजिक बांधिलकी म्हणून विद्यार्थ्यांनी अवश्य वर्षातून एकदा रक्तदान करावे असे त्यांनी सांगितले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.ए.एस.पवार यांनी नमूद केले की हे शिबिर महाविद्यालयाच्या सामाजिक जबाबदारी उपक्रमांचा एक महत्त्वाचा भाग आहे.राष्ट्रीय सेवा योजना द्वारे,आम्ही आमच्या विद्यार्थ्यांना समाजाच्या फायद्याच्या उपक्रमांमध्ये सातत्याने सहभागी करून घेतो.हे रक्तदान शिबिर आमच्या विद्यार्थ्यांना आणि जनतेला नागरी कर्तव्य बजावण्याची आणि गरजूंना मदत करण्याची एक उत्तम संधी आहे असे त्यांनी स्पष्ट केले. सर्व रक्तदात्यांना सुरक्षित आणि आरामदायी वातावरण प्रदान करण्यासाठी आवश्यक असलेले सर्व आरोग्य आणि सुरक्षा नियमांचे काटेकोरपणे पालन केले जाईल याची खात्री अष्टविनायक रक्तपेढीचे डॉ.बाळासाहेब देवकर व जनसंपर्क अधिकारी संदीप पाटोळे यांनी दिली आहे. या रक्तदान शिबिरामध्ये आनंद शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी रक्तदान करावे असे आवाहन प्रशासन अधिकारी डॉ.डी.बी.राऊत व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आरसुळ यांनी केले आहे. रक्तदान हीच धोंडेसाहेबांसाठी वाढदिवसाची भेट असेल अशा भावना व्यक्त केल्या.

### माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह

मतदार संघाचा लोकप्रतिनिधी म्हणून जेव्हा जेव्हा आपल्याकडे आलो तेव्हा आपल्याकडे या राज्याचे उपमुख्यमंत्रीपद,ग्रामविकास खाते असताना मतदार संघातील कामांना भरघोस निधी उपलब्ध करून दिला या आठवणींनी उजाळा देत.. आपल्या अद्वैतचंद्र निवासस्थानी आ.सुरेश धस यांनी विजयसिंह मोहिते पाटील यांचा यथोचित सन्मान केला. यावेळी राजेंद्र सिंह भोसले, राजाभाऊ निंबाळकर,पत्रकार सचिन रानडे उपस्थित होते.

### बजरंग बनसोडे यांची

केली आहे.त्याची दखल घेऊन केंद्रीय गृह विभागाने त्यांना सन २०२२ मध्ये तीन वर्ष राष्ट्रीय तपास यंत्रणा मधे तीन वर्षे काम करण्याची संधी दिली होती.तिथेही आपल्या कार्याचा ठसा उमटवत देशसंरक्षणा साठी सर्वोच्च अशी कामगिरी केली आहे.त्यांनी अनेक ठिकाणी धाडसी कारवाया करून अट्टल गुन्हेगारांना जेलची हवा दाखवली आहे.त्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी गौरविण्यात आले आहे.आता मुंबई येथे पोलीस उप आयुक्त पदावर गृह विभागाने जबाबदारी दिली आहे.

## डॉ.अमोल मोहळकर यांनी योग्य उपचार केल्याने गाईला मिळाले जिवदान

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील आरोग्य विभागातील अधिकारी डॉ. अमोल मोहळकर यांचा कर्तव्य दृष्टिकोन पुन्हा एकदा समोर आला आहे. पाटोदा शहरातील शेतकरी महादेव जाधव यांच्या गाईचा पाय मोडल्याची दुर्दैवी घटना घडली ही घटना पाटोदा आरोग्य विभागातील अधिकारी डॉ. अमोल मोहळकर यांना समजताच तात्काळ डॉक्टर मोळकर यांनी घटनास्थळी धाव घेत योग्य उपचार सुरू करून त्या गाईचे प्राण वाचवले.गाईच्या पायाच्या गंभीर जखमेवर डॉक्टर मोहळकर यांनी आपल्या सहकारी डॉ. हरिदास शेलार आणि डॉ. ओम गोरे यांना सोबत घेऊन शेतातच तातडीने शस्त्रक्रिया केली. अनेक तास सतत चाललेल्या उपचारांमुळे गाईची प्रकृती स्थिर झाली आणि तिचे प्राण वाचले.या मनोभावातून दिसून येते की डॉ. अमोल मोहळकर केवळ मानवतेसाठीच नव्हे, तर प्राण्यांप्रती असलेल्या प्रेमासाठीही नेहमी तत्पर असतात. शेतकरी महादेव जाधव यांनी या डॉक्टरांच्या संवेदनशीलतेचे व समर्पित प्रयत्नांचे कौतुक केले असून त्यांना मोठा आधार मिळाल्याचे सांगितले.पाटोदा तालुक्यातील ही घटना माणुसकीच्या नवीन परिभाषा मांडते. प्राण्यांच्या आरोग्यासाठी वेळ न घालवता तातडीने मदतीसाठी धावणाऱ्या डॉ. मोहळकर आणि त्यांच्या टीमचे शहरातील शेतकऱ्यांनी विशेष आभार मानले आहेत.ही घटना वैद्यकीय मदतीची तर आहेच, पण त्याहूनही अधिक माणुसकी आणि सहृदयतेची जिवंत साक्षी आहे, जी प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे.



## इनरव्हील क्लब अंबाजोगाईचा पदग्रहण सभारंभ उत्साहात संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

इनरव्हील क्लब अंबाजोगाई चा नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सभारंभ दि. २ ऑगस्ट रोजी उत्साहात पार पडला. यावेळी नुतन अध्यक्षा म्हणून संगिता नावंदर व नविन कार्यकारिणीतील इतर सदस्यांनी आपआपला पदभार स्विकारला.

येथील खोलेश्वर महाविद्यालयातील स्व. गोपीनाथ मुंडे सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून आमदार नमिताताई मुंदडा उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मावळत्या अध्यक्षा सुरेखा शिरसाठ यांनी मागील वर्षात इनरव्हील क्लबने केलेल्या सामाजिक कामांची उपस्थितांना माहिती दिली. यानंतर त्यांनी चारटर पिन व कॉलर नवीन अध्यक्ष संगीता नावंदर यांच्याकडे सोपवून अध्यक्षीय पदभार दिला. नुतन अध्यक्षा संगिता नावंदर यांनी आपल्या कार्यकाळात तळागाळातील सर्व समाजापर्यंत पोहचुन समाजिक कार्य करण्याचे ठरवले असल्याचे नमुद केले. यावेळी बोलताना आ. नमिताताई मुंदडा यांनी या क्लबच्या माध्यमातून महिला सामाजिक कार्य करत असल्याबद्दल कौतुक केले तसेच क्लबला सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी त्यांच्या हस्ते क्लबच्या सर्व माजी व आजी पदाधिका-यांचा व सुरेखा बंग या आदर्श अपंग गृहिणीचा सत्कार करण्यात आला.



# क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या विचारांना अभिप्रेत कार्य करू-खा.सोनवणे

## बीडमध्ये शेतकरी कामगार पक्षाचा वर्धापन दिन उत्साहात; दहा व्यक्तींचा पुरस्काराने गौरव

बीड । प्रतिनिधी

शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी केजमध्ये सुरू असलेला क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नावाचा पुरस्कार सोहळा बीडमध्ये घेऊन आले ही कौतुकाची बाब आहे. क्रांतिसिंह नाना पाटील यांचे कार्य चंद्र-सूर्य असेपर्यंत जनमानसात जिवंत राहील. त्यांच्या विचारांना अभिप्रेत असे कार्य खासदार या नात्याने करण्याचा मी प्रयत्न करीन, असेही त्यांनी सांगितले. बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात रविवारी (दि.३) शेतकरी कामगार पक्ष व क्रांतिसिंह नाना पाटील शेतकरी विकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने पुरस्कार वितरण आणि क्रांतिसिंह नाना पाटील व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून खा.बजरंग सोनवणे हे बोलत होते.

पक्षाचे ध्वजारोहण राज्य चिटणीस मंडळ सदस्या चित्राताई गोळेगावकर व प्रा. उमाकांत राठोड यांच्या हस्ते झाले. यावेळी ज्येष्ठ नेत्या सुशिला मोराळे, माजी आमदार उषा दराडे, शेकापचे जिल्हा चिटणीस भाई विष्णूपंत घोलप, राजकुमार घायाळ (हमाल मापाडी महामंडळ), ॲड.अजय बुरांडे (माकप), इकबाल पेंटर, चंद्रकांत चव्हाण (शिक्षक आघाडी), भाऊराव प्रभाळे (भाकप), राजेश घोडे (आझाद क्रांती सेना), रोहिदास जाधव (एसएफआय), प्रा. पंडित तुपे (युक्रांद), गणेश मस्के (संभाजी ब्रिगेड), ॲड. राहुल वायकर (विभागीय संभाजी ब्रिगेड), नितीन सोनवणे (पँथर सेना), सुभाष लोणके (डीपीआय), ॲड.शिवाजी कांबळे (समाजवादी पक्ष), अशोक येडे (आप) आदी मान्यवर उपस्थित होते. खा.बजरंग सोनवणे म्हणाले, क्रांतिसिंह नाना पाटील यांचे कार्य सुरू झाले, तेव्हा माझा जन्मही झालेला नव्हता. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ भाई मोहन गुंड गेल्या अनेक वर्षांपासून पुरस्कार सोहळा आयोजित करत आहेत. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी समाज प्रबोधन करत विविध समाजघटक एकत्र आणले. परंतु अलीकडील काळात जातीय विष पसरवणारे काहीजण वाढले आहेत. असे लोक कोणत्याही समाजाचे नसतात. त्यांना थारा देऊ नये. भाई मोहन गुंड यांचे कार्य राज्यभर सुरू आहे. केजचे सुपुत्र म्हणून त्यांचा आम्हाला अभिमान आहे, असे खा.बजरंग सोनवणे म्हणाले. कार्यक्रमात अनेक मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक भाई मोहन गुंड यांनी केले, सूत्रसंचालन व्याख्याते राहुल गिरी यांनी केले तर आभार प्रदर्शन ॲड.नारायण गोले पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भाई बापुसाहेब साळुंके, नागेश मिठे, अर्जुन सोनवणे, अशोक रोडे, संदीप पन्हाळे, अंगद मोहिते, मुकुंद शिंदे यांच्यासह इतरांनी प्रयत्न केले. कार्यक्रमास शेकापचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### भाई मोहन गुंड यांच्या नियोजनाचे सर्वत्र कौतुक

भाई मोहन गुंड व पक्षातील कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन केले. यानिमित्त अनेक वर्षांनंतर जिल्हाभरातील शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते एकत्र आले होते. मान्यवरांनी त्यांच्या नियोजनाचे विशेष कौतुक केले.

### पुरस्कार प्राप्त मान्यवरांचा सन्मान

अरुण जाधव (राजकीय), राजाभाऊ देशमुख (कृषी), सुधाकर देशमुख (पर्यावरण), डॉ. संदीप तांबारे (आरोग्य), शाहीर राजेंद्र कांबळे (सांस्कृतिक), कॉ.राजकुमार कदम (शैक्षणिक), उज्ज्वला पडलवार (कामगार), ह.भ.प. श्यामसुंदर सोन्नर (सांप्रदायिक), संपत मोरे (पत्रकारिता), जागृती अमरजीत तिवारी (क्रीडा) या मान्यवरांचा उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान करण्यात आला.

## हिंगणी हवेली येथे कृषी मेळावा उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी अंतर्गत सौ. के एस के काकू कृषी महाविद्यालय बीड येथील हिंगणी हवेली येथे कृषी मेळावा उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून पोखरा अंतर्गत योजना यावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीचे महत्त्व पटवून देण्यात आले. फळबाग लागवड व्यवस्थापन कसे करावे याची माहिती देण्यात आली. त्यामुळे कृषी ज्ञानात भर पडल्याचे समाधान शेतकऱ्यांनी व्यक्त केले. आधुनिक शेती पद्धती नवीन तंत्रज्ञान आणि सरकारी योजना ची माहिती या माध्यमातून शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यात आली. या कार्यक्रमासाठी कृषी सेवक नम्रता थोरात तसेच गावातील सरपंच व इतर शेतकरी उपस्थित होते. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे सहसचिव डॉ, जी, व्ही साळुंखे प्राचार्य एस,पी मोरे,डॉ, एस, जी माने, प्रा एल,एम बोंद्रे, डॉ, पी, बी मांजरे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कृषी दुतानी या कार्यक्रमाचे आयोजन केले.

cmyk

# शेतकऱ्यांना आनंदी करणारे कामकाज करू-कृषिमंत्री भरणे



**पुणे। प्रतिनिधी**

**कृषिमंत्रिपदाची सूत्रे स्वीकारताच दत्तात्रय भरणे यांनी कृषी आयुक्त सूरज मांढरे यांच्यासोबत काही तास चर्चा केली. त्यांनी कृषी विभागाची रचना, योजना समजावून घेतल्या. या विभागाच्या माध्यमातून कृषी क्षेत्रासाठी काम करण्यास चांगली संधी आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी अधिकाऱ्यांसोबत चर्चेत व्यक्त केली. दरम्यान, 'अॅग्रोवन'शी संवाद साधताना शेतकऱ्यांना आनंदी ठरणारे कामकाज करणार असल्याचे संकेत त्यांनी दिले.**

शेतकऱ्याचा मुलगा म्हणून शेतकऱ्यांसाठी काम करण्याची संधी मिळते आहे. त्यामुळे आनंद होतो आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा, आमच्या पक्षाचे वरिष्ठ नेते आणि महायुतीने ही जबाबदारी माझ्यावर दिली आहे. मी रोज गावाकडे शेतीत असतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न, अडचणी मला कळतात. शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसावा, यासाठी करावे लागणारे सारे प्रयत्न मी करेल. शेतकऱ्यांचे हित कशात आहे, हे पाहूनच मी भविष्यात निर्णय घेईल. या राज्यातील सामान्य शेतकरी केंद्रबिंदू मानून त्यांच्यासाठी जे काही करता येईल ते केले जातील. आता शेतीला आधुनिक रूप मिळते आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'एआय'चा वापर कृषी क्षेत्रात कसा वाढेल, त्यासाठी मी प्राधान्य देणार आहे. कृषी विभागाची सूत्रे स्वीकारून मला अवघे काही तास झाले आहेत. केंद्र शासनाचा जास्तीत जास्त निधी राज्यात कसा आणता येईल, कोणत्या योजना चांगल्या आहेत व त्या शेतकऱ्यांपर्यंत कशा पोहोचवता येतील, गावागावांत कृषी योजना कशा पोहचतील याविषयी मी अभ्यासाअंती काही मुद्दांचा पाठपुरावा करणार आहे. शेतकरी हिताच्या धोरणावर माझे लक्ष राहील. अर्थात, त्यासाठी मला अजून कामकाज समजावून घ्यावे लागणार आहे. राज्यातील बळीराजा आणि आमच्या कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांचे नाते मैत्रीचे असावे. अधिकारी किंवा कर्मचारी ही सरकारी व्यक्ती नसून तो माझ्या घरातील व्यक्ती आहे, अशी भावना शेतकऱ्याला वाटायला हवी. अधिकाऱ्यांनी देखील शेतकऱ्यांना सेवा देताना आपल्या माध्यमातून शेतात अन्नधान्याचे उत्पादन कसे वाढेल, त्यातून शेतकऱ्याच्या संसारात आनंद कसा फुलवता येईल, असा व्यवहार ठेवायला हवा. शेतकरी व कृषी अधिकारी हे राज्याच्या शेतीचे मुख्य घटक असून त्यांचे नाते मैत्रीचे, घरोब्याचे हवे. त्यासाठी उपयुक्त ठरणारे कामकाज करावे, हेच मी अधिकाऱ्यांना सांगू इच्छितो.

### कृषिमंत्री बनले विद्यार्थी

कृषिमंत्री दत्तात्रय भरणे हे कृषी आयुक्तालयाच्या अधिकाऱ्यांसमोर अक्षरशः कागदपेन घेऊन बसले. त्यांनी विद्यार्थ्यांप्रमाणे टिपणे घेतली. विमा योजना कशी चालते, शेतकऱ्यांचा फायदा काय, आयुक्तालयाचे काम कसे चालते, संचालक काय कामे करतात, तालुका कृषी अधिकारी काय करतो, ठिबकसह आत्मा यंत्रणेचे कामकाज त्यांनी समजून घेतले. या टिपणांमुळे मला खात्याचा अभ्यास होण्यास मदत झाली आहे, असे त्यांनी बोलून दाखवले. तसेच, राज्यात २० हजार कर्मचारी व ४-५ सनदी अधिकारी असलेला कृषी विभागाचा विस्तार पाहून 'महसूल'पेक्षाही 'कृषी' विभागाची यंत्रणा मोठी आहे, असा निष्कर्ष कृषिमंत्र्यांनी काढला.

# बोगस रासायनिक खत विक्रीच्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश

## कृषी विभागाची कारवाई; ११ लाखांचा साठा जप्त



**सोलापूर:** पंढरपूर तालुक्यातील कासेगाव परिसरात बोगस रासायनिक खत तयार करून शेतकऱ्यांना विक्री करणाऱ्या मोठ्या रॅकेटचा पर्दाफाश झाला आहे. कृषी विभागाच्या गुण नियंत्रण पथकाने पोलिसांसह कारवाई करत विठ्ठल खत कारखान्यावर छापा टाकून तब्बल ११ लाख १२ हजार रुपयांचे बनावट खत जप्त केले. यावेळी ७०० पोत्यांमध्ये हे खत साठवण्यात आलेले आढळून आले.

कृषी विभागाला मिळालेल्या माहितीच्या आधारे महालक्ष्मी फर्टिलायझर एलएलपी या कंपनीच्या वतीने विठ्ठल खत कारखान्यात बनावट खत तयार केलं जात असल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार गुण नियंत्रण अधिकाऱ्यांनी पोलिसांच्या मदतीने कारखान्यावर छापा टाकला असता, विविध कंपन्यांच्या नावाने लेबल लावलेले आणि आकर्षक पॅकिंगमध्ये तयार करण्यात आलेले रासायनिक खताचे ७०० पोते सापडले. जप्त केलेल्या खताचा अंदाजे बाजारमूल्य ११ लाख १२ हजार रुपये एवढा असून, ही संपूर्ण रक्कम बनावट खताच्या विक्रीतून कमवण्यात आली होती. शेतकऱ्यांची फसवणूक करण्याच्या या प्रकारामुळे कृषी विभागाकडून कडक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणी पुणे जिल्ह्यातील थेरगाव येथील सुदीप सुरेश साळुंखे, अहमदनगर जिल्ह्यातील हंडी निमगाव येथील योगेश बाळकृष्ण जाधव आणि पंढरपूरजवळील विठ्ठल खत कारखान्याच्या संचालकांविरोधात पंढरपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### आरोपींविरोधात गुन्हा दाखल

पोलिसांनी आरोपींविरोधात रासायनिक खत आदेश १९८५ मधील नियमांचे उल्लंघन, तसेच अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ च्या कलम २, ३ आणि ७ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सध्या याप्रकरणी अधिक तपास सुरू असून, आणखी काही आरोपींचा या रॅकेटशी संबंध आहे का, याचाही शोध घेतला जात आहे.शेतकऱ्यांच्या श्रमांची लूट करणाऱ्या या बोगस खत विक्रेत्यांविरोधात कठोर कारवाईची मागणी नागरिकांकडून होत आहे. कृषी विभागाच्या या कारवाईमुळे बनावट खत विक्रेत्यांमध्ये भीतीचं वातावरण पसरले आहे.

# टोमॅटोची रोपे कोलमडण्याची कारणे आणि उपाय



टोमॅटोची रोपे कोलमडणे ही एक सामान्य समस्या आहे, जी विविध कारणांमुळे होऊ शकते. या समस्येचे मुख्य कारण म्हणजे बुरशीजन्य रोग, ज्यामध्ये रोपांचे खोड कुजते आणि ते जमिनीवर पडतात.

**टोमॅटो रोपे कोलमडणे (डम्पिंग ऑफ) :**

हा बुरशीजन्य रोग रायझोक्टोनिया, फायटोप्थोरा किंवा पिथियम या बुरशीमुळे होतो. रोपवाटिकेत आणि पुनर्लागवडीनंतर रोप वाढीच्या प्राथमिक अवस्थेत प्रादुर्भाव दिसून येतो. बियाणे पेरल्यानंतर गादीवाफ्यावर रोप उगवून जमिनीवर येण्यापूर्वीच रोगाचा प्रादुर्भाव होऊन मरते. बियांतून बाहेर येणारा अंकुर कुजतो. रोपाचे मूळ व खोडाचा जमिनीलगतचा भाग कुजतो व रोप उन्मळून पडते.

**असे करा व्यवस्थापन :**

रोपवाटिकेसाठी पाण्याचा निचरा होणारी जमीन निवडावी. गादीवाफ्यांना कमी प्रमाणात पाणी नियमित पाणी देऊन वाफसा स्थिती ठेवावी. बियाणे जास्त दाट पेरू नये. चांगल्या कुजलेल्या शेणखताचा वापर करावा. प्रति किलो बियाण्यास, कार्बेन्डाझिम (५० डब्ल्यूपी) २.५ ग्रॅम याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. मेटॅलॅक्झिल एम (३१.८ ई.एस.) २.५ ग्रॅम किंवा थायोफेनेट मिथिल (३८ %) + कासुगामायसिन (२.२१ % एससी) (संयुक्त बुरशीनाशक) २.५ मिली किंवा कॉपर ऑक्सिक्लोराइड (०.३ टक्का) २.५ ते ३ ग्रॅम या प्रमाणे प्रति झाड ५० ते १०० मिली या प्रमाणात आळवणी करावी.

# अल्पभूधारक शेतकऱ्यांना ट्रॅक्टर घेण्यासाठी सरकार देणार १.५ लाख अनुदान




**राज्य सरकारच्या माध्यमातून कृषी क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टिकोनातून अनेक महत्त्वाच्या अशा योजना राबवल्या जात आहेत. या योजनांच्या माध्यमातून शेती क्षेत्रामध्ये अनेक महत्त्वाच्या पायाभूत सुविधा तसेच यांत्रिकीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक योजनांच्या माध्यमातून अनुदान स्वरूपात मदत करण्यात येत असल्यामुळे राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना देखील खूप मोठ्या प्रमाणावर फायदा होताना दिसून येत आहे. कृषी क्षेत्रामध्ये यंत्रांचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला असल्याने राज्य सरकारने कृषी यांत्रिकीकरण प्रोत्साहन योजना राबवायला सुरुवात केली असून या माध्यमातून राज्यातील लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांना ट्रॅक्टरसाठी अनुदान देण्यात येत आहे.**

**कृषी यांत्रिकीकरण प्रोत्साहन योजना**

राज्यातील लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांना शेतीमध्ये ट्रॅक्टरसारख्या यंत्राचा वापर करता यावा व त्यांचा उत्पादन खर्च कमी होऊन उत्पादनात वाढ व्हावी याकरिता कृषी यांत्रिकीकरण प्रोत्साहन योजना राबवली जात आहे व या माध्यमातून शेतकऱ्यांना ट्रॅक्टर करीता १ लाख ५० हजार रुपयेपर्यंत अनुदान देण्यात येते. कारण बऱ्याचदा अल्पभूधारक शेतकऱ्यांना पैशांअभावी आधुनिक यंत्रसामग्री खरेदी करणे दुरापास्त होते. त्यामुळे यांत्रिकीकरणाचा वापर करण्याकरिता आवश्यक यंत्रसामग्री खरेदी पासून असे शेतकरी वंचित राहतात. त्यातल्या त्यात ट्रॅक्टरसारखा यंत्राचा वापर शेतीतील बऱ्याच कामांमध्ये होत असल्यामुळे राज्यातील अल्पभूधारक शेतकरी ट्रॅक्टर खरेदीपासून वंचित राहू नयेत म्हणून सरकारने ही योजना सुरू केली आहे.

**या योजनेतून शेतकऱ्यांना एवढे मिळेल अनुदान :**

या योजनेच्या माध्यमातून महिला शेतकरी, अनुसूचित जाती आणि जमातीतील शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान देण्यात येणार असून यामध्ये ट्रॅक्टरसाठी अनुदान मर्यादा ही १ लाख २५ हजार रुपये इतकी ठेवण्यात आलेली आहे. तसेच कृषी यांत्रिकीकरण प्रोत्साहन योजनेच्या माध्यमातून इतर सर्व शेतकऱ्यांना ४० टक्के अनुदान मिळणार आहे व ट्रॅक्टरसाठी हे अनुदान मर्यादा १ लाख रुपये ठेवण्यात आलेली आहे.

**आवश्यक पात्रता आणि नियम :**

या योजनेच्या माध्यमातून एका वेळी शेतकऱ्यांना एका यंत्रासाठी अनुदान मिळणार आहे. दुसरे महत्त्वाचे म्हणजे पूर्वी जर शेतकऱ्याने ट्रॅक्टरसाठी अनुदान घेतले असेल तर पुढील दहा वर्षापर्यंत त्याला या योजनेच्या माध्यमातून ट्रॅक्टरसाठी मिळणाऱ्या अनुदानाकरिता अर्ज करता येणार नाही. परंतु शेतकरी इतर नवीन यंत्रासाठी मात्र अर्ज करू शकणार आहे. सध्या कुटुंबामध्ये जर कोणाच्या नावावर ट्रॅक्टर असेल तर त्या ट्रॅक्टरवर चालणाऱ्या अवजारांसाठी शेतकरी अनुदानासाठी अर्ज करू शकतो. परंतु यामध्ये मात्र ट्रॅक्टरच्या मालकीचा पुरावा देणे गरजेचे राहील व त्यानंतर या योजनेचा लाभ मिळेल.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी इथे करा अर्ज :**

जर तुम्हाला देखील या योजनेच्या माध्यमातून ट्रॅक्टर खरेदीवर अनुदान मिळवायचे असेल तर त्याकरिता तुम्हाला ऑनलाईन अर्ज सादर करणे गरजेचे आहे व त्यासाठी तुम्ही ह ीं ीं ि ी : / / ारहरवलीं.ारहरीरीहींर.सीं.ळप/ ऋरीाशी/असीळडेसळप/ असीळडेसळप / या लिंकवर जाऊन अर्ज करू शकतात किंवा तुमच्या जवळच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयात जाऊन प्रत्यक्ष अर्ज सादर करणे शक्य आहे. याकरिता तुम्ही तुमच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयामध्ये जाऊन आवश्यक माहिती घ्यावी व त्यांच्या मार्गदर्शनाखाली अर्ज सादर करावा असे आवाहन देखील कृषी विभागाने केलेले आहे.




### महत्वाच्या घटना

१६६६ : नेदरलँड्स (डच) आणि इंग्लंड देशांत झालेल्या समुद्री युद्धात इंग्रज सैन्यांनी विजय मिळविला.
१८५४ : जपानच्या जहाजातून अधिकृत पणे हिनोमारा ध्वज वापरण्यात सुरवात झाली.
१८७० : युद्धाच्या वेळी आजारी व जखमी सैनिकांना मदत करण्यासाठी लंडन या देशांत ब्रिटीश रेड क्रॉस सोसायटीची स्थापना करण्यात आली.
१८८६ : कोलंबिया देशाच्या राज्यघटनेनुसार कोलंबिया चे नाव बदलून अमेरिका करण्यात आले तेव्हा त्यांनी नवीन संविधान स्वीकारले.
१९१४ : पहिले महायुद्ध जर्मनीने बेल्जियमवर चढाई केली. प्रत्युत्तरादाखल युनायटेड किंग्डमने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले. अमेरिकेने तटस्थ असल्याचे जाहीर केले.
१९२४ : सोविएत युनियन व मेक्सिकोमधे राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.
१९३५ : ब्रिटीश सरकारने गवर्नमेंट ऑफ इंडिया ऐक्टला मंजुरी दिली.
१९४७ : जपानच्या सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली.
१९५६ : भाभा अणुशक्ती केंद्र तुर्भे येथे 'अप्सरा' ही भारताची सहावी अणुभट्टी कार्यान्वित झाली.
१९६७ : तेलंगाना राज्यातील कृष्ण नदीवर बांधण्यात आलेला जगातील सर्वात लांब दगडी नागार्जुन सागर धरणाचे उद्घाटन करण्यात आलं.
१९८४ : 'अपर व्होल्टा' या देशाचे नाव बदलुन 'बुर्किना फासो' असे करण्यात आले.
१९९३ : राजेन्द्र खंडेलवाल या पुण्याच्या अपंग परंतु जिद्दी साहसवीराने समुद्रसपाटीपासून १८,३८३ फुटांवर असलेली 'खारदुंग ला' ही खिंड आपल्या चार सहकार्यांसह स्कुटरवरुन (कायनेटिक होंडा) पार केली. त्याच्या या कामगिरीची 'गिनेस बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस' मधे नोंद झाली.
१९९८ : फिलिपाइन्सच्या माजी अध्यक्षा कोरेझॉन ॲक्विनो यांना आंतरराष्ट्रीय सामंजस्यासाठीचा 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' जाहीर
२००१ : मरणोत्तर त्वचादान करुन दुसर्यांना जीवनदान देणारी, भारतातील पहिली स्किन बँक मुंबई येथील लोकमान्य टिळक रुग्णालयात स्थापन झाली.
२००७ : नासा चे फिनिक्स हे अंतराळ यान प्रक्षेपित कण्यात आले.
२००८ : भारत सरकारने शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला (एससीआय) नवरत्न दर्जा प्रदान केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५२२ : मेवाड राजघराण्यातील १२ वे शासक व राजस्थान राज्यातील उदयपुर शहराचे संस्थापक तसचं, महाराणा प्रताप यांचे वडिल राणा उदय सिंह यांचा जन्मदिन.
१७३० : सदाशिवराव भाऊ पानिपतच्या तिसर्या युद्धातील सरसेनापती (मृत्यू: १४ जानेवारी १७६१)
१८२१ : लुई व्हिटोन कंपनीचे निर्माते लुई व्हिटोन यांचा जन्म. (मृत्यू: २७ फेब्रुवारी १८९२)
१८३४ : जॉन वेन ब्रिटिश गणितज्ञ (मृत्यू: ४ एप्रिल १९२३)
१८४५ : सर फिरोजशहा मेहता कायदेपंडित, समाजसुधारक व राजकीय नेते, उत्तम प्रशासक व काँग्रेसचे एक संस्थापक. १९१३ मधे 'बॉम्बे क्रॉनिकल' हे इंग्रजी भाषेतील पहिले राष्ट्रीय बाण्याचे वृत्तपत्र त्यांनी मुंबईत सुरू केले. (मृत्यू: ५ नोव्हेंबर १९१५)
१८६३ : महामहोपाध्याय वासुदेवशास्त्री अभ्यंकर पातंजलीच्या संकृत महाभाष्याचा मराठीत अनुवाद करणारे विद्वान (मृत्यू:)
१८८८ : भारतीय धर्मगुरू ताहेर सैफुद्दीन यांचा जन्म. (मृत्यू: १२ नोव्हेंबर १९६५)
१८९४ : नारायण सीताराम तथा ना. सी. फडके साहित्यिक व वक्ते (मृत्यू: २२ आक्टोबर १९७८)
१९२९ : आभासकुमार गांगुली तथा किशोर कुमार पार्श्वगायक, संगीतकार, गीतकार, निर्माता, दिग्दर्शक, आभिनेता व पटकथालेखक, त्यांनी सुमारे ४०० हून अधिक चित्रपटांत गाणी गायिली. 'चलती का नाम गाडी' सारख्या निखळ विनोदी चित्रपटाबरोबरच 'दूर गगन की छाँव में' सारखे गंभीर चित्रपटही काढले. (मृत्यू: १३ आक्टोबर १९८७)
१९३१ : नरेन ताम्हाणे यष्टीरक्षक आणि फलंदाज (मृत्यू: १९ मार्च २००२)
१९५० : भारतीय वकील आणि राजकारणी एन. रंगास्वामी यांचा जन्म.
१९६१ : बराक ओबामा अमेरिकेचे ४४ वे आणि पहिले कृष्णवर्णीय राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते
१९७८ : भारतीय राजकारणी संदीप नाईक यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

२२१ : चीनी सम्राज्ञी लेडी जेन यांचे निधन. (जन्म: २६ जानेवारी १८३)
१०६० : हेन्री (पहिला) फ्रान्सचा राजा (जन्म: ४ मे १००८)
१८७५ : हान्स अँडरसन डॅनिश परिकथालेखक (जन्म: २ एप्रिल १८०५)
१९३७ : डॉ. काशीप्रसाद जायस्वाल प्राच्यविद्या पंडित व कायदेतज्ज्ञ (जन्म: २७ नोव्हेंबर १८८१)
१९७७ : नोबेल पुरस्कार विजेते इंग्रजी फिजिओलॉजिस्ट एडगर अ‍ॅड्रियन यांचे निधन. (जन्म: ३० नोव्हेंबर १८८९)
१९९७ : जीन काल्मेंट १२२ वर्षे आणि १६४ दिवस जगलेली फ्रेन्च महिला (मृत्यू: २१ फेब्रुवारी १८७५)
२००३ : नोबेल पुरस्कार विजेते अमेरिकन बालरोगतज्ज्ञ फ्रेडरिक चॅपमॅन रॉबिन्स यांचे निधन. (जन्म: २५ ऑगस्ट १९१६)
२००६ : नंदिनी सत्पथी भारतीय लेखक व राजकारणी (जन्म: ९ जून १९३१)
२०२० : शिवाजीराव पाटील निलंगेकर महाराष्ट्राचे वे१० मुख्यमंत्री (जन्म: ४ ऑगस्ट १९३१)

# ऊस बेणे मळ्याचे व्यवस्थापन

**कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस लागवडीखालील जमिनीची पाच भागांमध्ये विभागणी करावी. प्रत्येक वर्षी एका भागात बेणे बदल करावा. साधारणपणे गवताळ वाढ, काणी, रेड रॉट आणि वायएलडी अशा रोगामुळे ऊस उत्पादनामध्ये १० टक्के घट येऊ शकते. ही घट बेणे बदल करून टाळता येऊ शकते.**

लागण वेळ : बेण्याचे वय ८ ते १० महिन्यांचे असताना तोडले जावे. शेतकरी कोणत्या महिन्यात जास्त लागण करतो, त्यानुसार पाठीमागे जाऊन बेणे मळा लागण करावी.

जमीन : जमीन ही क्षारपड, चोपण किंवा पाणथळयुक्त नसावी. बेणेमळा हा कारखाना कार्यक्षेत्राच्या विविध गटांत आणि वेगवेगळ्या जातींचा घेतलेला असावा. शेतकऱ्यांना बेणे वितरणासाठी सोयीचे असावे. बेणे मळ्यापासून चांगल्या रस्त्याची सोय असावी त्यामुळे वाहतूक खर्च कमी करता येईल. बेणे मळ्यासाठी प्रगतिशील शेतकऱ्यांची निवड करावी. मूलभूत बियाणे हे कारखाना रोपवाटिका किंवा संशोधन केंद्रावरून आणलेले असावे. त्याचे गुणन करून बेणे मळ्यासाठी वापरावे.

जमीन मशागत : चांगली खोलवर नांगरट करून उभी-आडवी वखरणी करावी. उसाच्या चांगल्या वाढीसाठी जमिनीत २५ ते ३० टन एवढे चांगले कुजलेले शेणखत दुसऱ्या वखरणी अगोदर मिसळून मातीआड करावे किंवा शेणखत उपलब्ध नसेल तर १० टन चांगली कुजलेली प्रेसमड मिसळावी किंवा ५ टन गांडूळ खताचा वापर करावा.

बेणे : बेण्याची निर्मिती एक डोळा, दोन डोळा, कांडी किंवा उती संवर्धित रोपांपासून केली जाते. बेण्यासाठी लागण केलेला ऊस तोडण्यापूर्वी ६ आठवडे अगोदर अतिरिक्त नत्र खताची मात्रा द्यावी त्यामुळे कांडीतील रसरशीतपणा व पोषणद्रव्य वाढून बेण्याची उगवण क्षमता वाढीस लागते. व्यवस्थितरीत्या पाला काढून बेणे धारदार कोयत्याने थोडे तिरक्या पद्धतीने एका झटक्यात तोडावे म्हणजे कांडी फुटणार नाही किंवा डोळा खराब होणार नाही, शक्यतो बेणे शेतावर नेऊन तिथेच तोडून बेणे प्रक्रिया करून लागण करावी. मूळकुज, कांडीकुज यांसारख्या रोगांच्या नियंत्रणासाठी १०० लिटर पाण्यात १०० ग्रॅम कार्बेन्डाझिम मिसळून त्यामध्ये बेणे १० ते १५ मिनिटे भिजत ठेवावे.

सरीरातील अंतर : जमिनीच्या पोताप्रमाणे ४.५ ते ५.० फूट १५ ते २० सेंटिमीटर दोन डोळ्यांतील अंतर ठेवून लागण करावी. बेणे तोडताना डोळ्याच्या वरचा १/३ व खालचा २/३ भाग ठेवून टिपरी तोडावी, वरंब्याच्या बगलेला डोळे येतील याप्रमाणे दोन डोळा टिपरी सरीत ठेवून डोळ्यावर दोन ते अडीच इंच माती लावून कोरडी लागण करून हलक्या प्रवाहाने पाणी द्यावे. नेहमीच्या बेण्याचे गुणन १ : १० ते १ :१२ असे होते म्हणजे १ हेक्टर क्षेत्रावर तयार केलेल्या बेणेमळ्यातून साधारणपणे १० ते १२ हेक्टर लागण होते. परंतु हा बेणेमळा उती संवर्धित रोपांचा वापर करून केल्यास त्याचे १:२० ते १:२५ प्रमाणे गुणन होऊ शकते.

बेणे टिपरी संख्या : हेक्टरी २५ हजार दोन डोळा टिपरीचा वापर करावा. उष्ण बाष्प हवा प्रक्रिया केलेले बेणे हे मूलभूत बेण्यासाठी वापरताना २५ टक्के जास्तीचे बेणे लागण करावी. कारण उष्ण बाष्प हवा प्रक्रियेमुळे कमकुवत बेणे मरण पावतात.

आंतरमशागत : योग्य वेळी बाळ बांधणी, मोठी 'बांधणी तसेच खुरपणी व एकात्मिक तण व्यवस्थापन करावे. बेणे मळ्यामध्ये रोगग्रस्त (काणी, गवताळ वाढ) बेटे तसेच दुसऱ्या ऊस जातीची बेटे दिसून आल्यास ती तत्काळ काढून नष्ट करावीत. बेणेमळ्यातील उसाचे पाचट काढू नये.

रासायनिक खतांची मात्रा : बेणेमळातील जोमदार वाढीसाठी नेहमीपेक्षा खत मात्रा जास्त द्यावी लागते. लागणीच्या वेळी सरीत ५० किलो नत्र, ७० किलो स्फुरद आणि ७० किलो पालाश द्यावे. प्रति हेक्टरी २५ किलो फेरस सल्फेट, २० किलो झिंक सल्फेट १० किलो आणि मॅग्नेशिअम सल्फेट लागणीच्या वेळी शेणखतात मिसळून द्यावे. लागणीनंतर एक महिन्याने ५० किलो, दोन महिन्यांनंतर १०० किलो तिसऱ्या व चौथ्या महिन्यानंतर ५० किलो नत्र खताची मात्रा द्यावी. मोठ्या बांधणीच्या वेळी १०० किलो नत्र, ६० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाश एकत्रित मिसळून मोठी बांधणी करावी. मोठ्या बांधणीनंतर एक व दोन महिन्यांनी ५० किलो नत्र पाण्यातून किंवा ठिबक सिंचनमधून द्यावे. ऊस बेणे प्लॉट तोडणीपूर्वी राहिलेले १०० किलो नत्र प्रति हेक्टरी द्यावे. एक हेक्टर बेणेमळा क्षेत्रासाठी ५ टन गांडूळ खत, ६०० किलो नत्र, २३० किलो स्फुरद आणि १२० किलो पालाश खत मात्रेची शिफारस आहे.

# आष्टीत ग्रामपंचायत कामगार,कर्मचारी महासंघाचा आज मेळावा -सुरेश निकाळजे

आष्टी । प्रतिनिधी

**आष्टी तालुका ग्रामपंचायत कामगार,कर्मचारी महासंघाचा सोमवारी दि.४ आगस्ट २०२५ रोजी आष्टी पंचायत समिती सभगृहात ११.३० वाजता मेळावा होणार आहे. य मेळाव्यास सर्व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष का. सुरेश निकाळजे व तालुकाध्यक्ष का.मधुकर कर्डीले यांनी केले आहे. आष्टी तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कामगारांना व कर्मचारी यांना या मेळाव्याच्यावतीने आवाहन करण्यात आले आहे की, आज रोजीपर्यंत ३० ते ३५ वर्षापासून महाराष्ट्र राज्य ग्रामविकास व पंचायत राज समिती कडून रु पगार २५० रु.पासून ते १२ हजार ते १३ हजार रु.पर्यंत पगाराची मजल मारलेली आहे. काही मागण्याची अंमलबजावणी झाली तर काही मागण्यांची अमंलबजावणी झालेली नाही. प्रत्येक जिल्हा परिषद व प्रत्येक तालुकानिहाय राहिल्यामुळे खालील मुद्द्यावर मेळावा होत आहे.**

व अभय आवलकर समितीच्या शिफारशी लागू करा, ५४ महिन्याचा एरीअस शासनाकडे थकीत असून फक्त १९ महिन्याचा एरीअस आजून ३५ महीन्याचा थकीत एरीअस ताबडतोब द्या,किमान वेतनाची मुदत २०२३ ला संपली असून ५ वर्षे पूर्ण झाली आहे असुन ६००० रु पगार वाढ झाली यांची अंमलबजावणी ताबडतोब करावी,



किमान वेतनाप्रमाणे आता सध्या १२ हजार रु पगार आहे, त्या मध्ये ६ हजार रु वाढ करून १८ हजार रु पगाराची अंमलबजावणी करावी, राहणीमान भत्ता आजपर्यंत थकीत असून प्रत्येक ग्राम १०० टक्के शासनाच्या तिजोरीतून द्यावा, राहणीमान भत्ता आज रोजीपर्यंत ग्रामपंचायतकडे १५ वर्षे झाले तरी थकीत राहणीमान भत्याच्या रकमा ग्रामपंचायतकडून द्यावा,जीपीएफच्या अर्धा हिस्स्याची रक्कम रुपये थकीत ग्रामपंचायतकडून कामगाराच्या खात्यात ताबडतोब खात्यात जमा करावी,करवसुली असूनसुद्धा वसुली नाही म्हणून राहणीमान भत्त्यापासून व जीपीएफच्या अर्ध्या हिस्सापासून ग्रामपंचायत कामगारांना वंचित ठेऊ नका, त्यांची दिशाभूल करू नका, प्रत्येक महिन्याच्या ५-६ तारखेला पगार झाला पाहिजे, सेवानिवृत्ती होणे आगोदर ग्रामपंचायत कामगाराची मागील सर्व थकीत राहणीमान भत्ता व जीपीएफच्या सर्व थकीत रुपये रक्कम देऊन गटविकास अधिकारी,विस्तार अधिकारी व ग्रामविकास अधिकारी, सरपंचाच्यासहीने सेवानिवृत्त झाला अशी लेखी स्वरूपात आदेश देऊन कमी करावे, महाराष्ट्र राज्य ग्रामविकास खात्या मार्फत १० टक्के आरक्षणाची अंबलबजावणी करून जिल्हा परिषदला आदेश देऊन ताबडतोब भरती प्रक्रिया सुरु करावी या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कामगार,कर्मचारी महासंघाचे सरचिटणीस कॉ.नामदेव चव्हाण, जिल्हा कार्यकरणी, कॉ.भागवत वंजारे,कॉ.गोरख पिंगळे हे उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यास आष्टीचे गटविकास अधिकारी गोकुळ बागलाने,विस्तार अधिकारी जायभाये,विस्तार अधिकारी एन.डी. शिंदे, आष्टी तालुका ग्रामसेवक संघटनेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य हे उपस्थित राहणार आहेत. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी कोणाच्याही दबावाला बळी न पडता उपस्थित रहावे असे आवाहन बीड जिल्हा ग्रामपंचायत कामगार,कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष कॉ.सुरेश निकाळजे, आष्टीचे तालुकाध्यक्ष कॉ. मधुकर कर्डिले,सर्व उपाध्यक्ष सर्व सदस्य यांनी केले आहे. जिव्हाळ्याच्या मागण्यांवर या मेळाव्यात चर्चा होणार आहे. पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार आहे.

# माजलगाव तहसील कार्यालयाच्या वतीने महसूल सप्ताह साजरा होणार

## सप्ताहात सात दिवस जनतेसाठी विविध उपक्रमांचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाच्या निर्देशानुसार, दिनांक ०१ ऑगस्ट २०२५ पासून दिनांक ०७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत राज्यभरात ''महसूल सप्ताह-२०२५'' साजरा करण्यात येणार आहे.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,अपर जिल्हाधिकारी बीड हरीश धार्मिक,अपर जिल्हाधिकारी अंबाजोगाई सौ. अश्विनी सोनवणे,निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी,उपविभागीय अधिकारी माजलगाव गौरव इंगोलो तसेच तहसीलदार माजलगांव संतोष रुईकर यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगांव तालुक्यात महसूल सप्ताह राबविण्यात येत आहे.या सप्ताहात शासनाच्या विविध महसूल संबंधित योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे, जनतेपर्यंत सेवा पोहोचविणे आणि जनजागृती यासाठी खालीलप्रमाणे विशेष उपक्रम राबविण्यात येतील दि ०१ ऑगस्ट रोजी महसुल दिन साजरा करणे व महसुल सप्ताह शुभारंभ, महसुल संवर्गातील कार्यरत/सेवनिवृत्त अधिकारी /कर्मचारी संवाद, उत्कृष्ट अधिकारी कर्मचारी पुरस्कार वितरण व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण समारंभ,दि ०२ ऑगस्ट रोजी शासकीय जागेवर सन २००१ पुर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटूंबांपैकी अतिक्रमण नियमानुकुल करण्यास पात्र असलेल्या कुटुबांना सदर अतिक्रमित जागांचे पट्टे वाटप करणे याबाबत कार्यक्रम,दि ०३ ऑगस्ट रोजी पाणंद/शिवरस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे.दि ०४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळनिहाय राबविणे,दि ०५ ऑगस्ट रोजी विशेष सहाय्य योजनेतील डीबीटी न झालेल्या लाभाध्यर्थ्यांना घरभेटी करुन डोबीटी करुन घेणे,दि ०६ ऑगस्ट रोजी शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित करणे व त्या अतिक्रमणमुक्त करणे तसेच शर्तभंग झालेल्या जमिनींबाबत शासन धोरणानुसार (नियमानुकूल करणे/सरकार जमा करणे) निर्णय घेणे,दि ०७ ऑगस्ट रोजी - धोरणाची अंमलबजावणी करणे व नवीन मानक कार्यप्रणालीप्रमाणे ( प्रमाणे) धोरण पूर्णत्वास नेणे आणि महसूल सप्ताह सांगता समारंभ,या महसूल सप्ताहाच्या कालावधीत नागरिकांना महसूल खात्याच्या सेवा अधिक सुलभपणे मिळाव्यात यासाठी सर्व नागरिकांनी या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा आणि प्रशासनाशी थेट संवाद साधावा, असे आवाहन तहसील कार्यालय माजलगांव यांच्यातर्फे करण्यात येत आहे.




# पारोडी येथे नातवाचे आजीच्या प्रथम वर्षश्राध्दानिमित्त वृक्षारोपण जि.प. प्राथमिक शाळेतील मुलांसाठी केली ग्राउंडची सोय

## स्तूत्य उपक्रम राबवून समाजासमोर आदर्श

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

तालुक्यातील पारोडी येथे आजीच्या वर्षश्रद्धा निमित्त अनावश्यक खर्च टाळूल अनोखा उपक्रम व समाजिक कामात व नैसर्गिक कामात अग्रेसर असणारे दादा घोडके यांनी एक सामाजिक आणि पर्यावरणीय उपक्रम राबवून अनुकरणीय उदाहरण मांडले आहे. आणि त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलांसाठी मातीचे ग्राउंड तयार करण्यासाठी ३१ हजार रुपये दिले तसेच शाळेच्या आवारात विविध वृक्षरोपण करून एक स्तूत्य उपक्रम राबवून समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

दादा घोडके यांना नेहमी वाटते आपण एक समाजासाठी काही तरी देणं आहे म्हणून त्यांना वाटले आपल्या पारोडी गावातील शाळेला शिक्षणासाठी सहाय्य करावे त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील मुलांसाठी



ग्राउंड तयार करण्यासाठी ३१ हजार रुपये

देऊन त्यांनी मदत केली आणि शाळेतील मुलांना नैसर्गिक खेळण्याची सोय करून दिली. तसेच पर्यावरण संवर्धन करणे आवश्यक आहे म्हणून शाळेमध्ये वेगवेगळ्या जातींची झाडे लावून हरितक्षेत्र वाढविण्यासाठी योगदान दिले. त्यांनी अनावश्यक खर्च टाळून सामाजिक कार्य वर्षश्राद्धासारख्या कार्यक्रमातील अनावश्यक खर्च टाळून समाजहिताच्या कामांना प्राधान्य दिले आहे. तसेच हभप सोमनाथ महाराज मेटे यांच्या प्रवचनाचा कार्यक्रम झाला. यावेळी गावकरी, नातेवाईक,मित्रपरिवार आणि विविध क्षेत्रातील लोक उपस्थित होते. अशा प्रकारच्या सामाजिक जागृतीमुळे इतरांनाही पर्यावरण आणि शिक्षणक्षेत्रात योगदान देण्यास प्रेरणा मिळेल. हा उपक्रम समाजातील जबाबदारीची भावना आणि पर्यावरणप्रेम दर्शवतो आहे.

# बाबासाहेबांनी दाखवलेल्या बुद्धांच्या मार्गाने अनिष्ट रूढी परंपरा झुगारून विज्ञानवादी दृष्टिकोनातूनच समाजाची प्रगती होऊ शकते - ॲड. राजेश शिंदे

बीड । प्रतीनिधी

बीड तालुक्यातील मौजे वरवटी येथे साहित्य सम्राट डॉ. अण्णाभाऊ साठे यांची १०५ व्या जयंती उत्साहात साजरी करण्यात आली या वेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड. राजेश शिंदे उपस्थित होते त्यांनी या प्रसंगी बाबासाहेबांनी दाखवलेल्या बुद्धांच्या मार्गाने अनिष्ट रूढी परंपरा बंद करून विज्ञानवादी दृष्टिकोनातूनच समाजाची प्रगती होऊ शकते याच बरोबर उच्च शिक्षण घेऊन अण्णाभाऊ साठे यांचा वैचारिक वारसा पुढे नेणे काळाची गरज आहे असे मत समाज बांधवांना संबोधित करताना मत व्यक्त केले. शिक्षण हाच अण्णाभाऊ साठेंच्या साहित्याचा गाभा आहे. आजच्या तरुणांनी ही प्रेरणा घेऊन शिक्षण घेतलं पाहिजे.

मौजे वरवटी येथे तरुणांनी साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या



१०५ व्या जयंती चे आयोजन केले होते यावेळी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले या वेळी मार्गदर्शक म्हणून आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते ॲड. राजेश शिंदे उपस्थित होते यावेळी त्यांनी अनिष्ट रूढी परंपरा झुगारून अण्णाभाऊंच्या विद्रोही साहित्याच्या माध्यमातून स्वतःची व समाजाची प्रगती करून शैक्षणिक कास धरणे गरजेचं आहे अण्णाभाऊंना बाबासाहेबांनी जग बदल घालुनी घाव मज सांगून गेले भीमराव हा मौलिक उपदेश समाजहिताचा आहे यावर ही कृती करणे आवश्यक आहे बाबासाहेबांनी दाखवलेल्या बुद्धांच्या मार्गाने अनिष्ट रूढी परंपरा बंद करून विज्ञानवादी दृष्टिकोनातूनच समाजाची प्रगती होऊ शकते असेही याप्रसंगी मत व्यक्त केले. उच्च शिक्षण घेऊन अण्णाभाऊ साठे यांचा वैचारिक वारसा पुढे नेणे काळाची गरज आहे असे मत समाज बांधवांना संबोधित करताना मत ॲड. राजेश शिंदे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी प्रदीप कोठुळे, बंडू वरभाऊ, रामभाऊ शिंदे, बाबासाहेब कोटुळे, दिलीप कोटुळे, गणेश कोटुळे, संतोष कोटुळे, दत्ता लांडगे, शंकर लांडगे, रायचंद लांडगे, बाळू लांडगे, भीमराव लांडगे, किसन लांडगे, दयानंद लांडगे, उत्त्रेश्वर लांडगे, गोकुळ लांडगे, अंजली लांडगे, रवी लांडगे, दादाराव लांडगे, महादेव लांडगे, खंडू लांडगे, कैलास लांडगे, संजय लांडगे, राजेश लांडगे, अजिंक्य लांडगे, विकास लांडगे, कारण लांडगे, अभिषेक लांडगे, ओम लांडगे, नवनाथ लांडगे, रोहन लांडगे यांच्यासह महिला तरुण समाज बांधव उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोकुळ लांडगे प्रास्ताविक अंजली लांडगे व आभार प्रदर्शन बाबा लांडगे यांनी केले असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळवले आहे.

# कृषी दुतांनी हिंगणी हवेली येथे राबविली पशु लसीकरण मोहीम



**बीड । प्रतिनिधी**

हिंगणी हवेली येथे के एस के कृषी महाविद्यालयाच्या कृषी दुतांनी सक्रिय सहभागाने लंपी आणी घटसर्प रोगप्रतिबंधक लसीकरण मोहीम यशस्वीपणे पार पडली. पशुसंवर्धन विभागाचे प्रमुख के, डी नागरगोजे आणि गावाचे सरपंच शाहिद पटेल यांच्या उपस्थितीत आयोजित या मोहिमेत पशुवैद्यकीय डॉ अहमद खान पठाण यांनी लसीकरण प्रक्रिया कुशलतेने पूर्ण केली. या मोहिमेत पाच ते सहा गावकऱ्यांनी सहभाग घेतला. या मोहिमेला महाविद्यालयाचे सहसचिव डॉ, जी, व्ही साळुंखे प्राचार्य एस,पी मोरे कार्यक्रम समन्वयक डॉ, एस, टी शिंदे, प्रा एल, एम बोंद्रे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. के एस के कृषी महाविद्यालयाच्या कृषी दुताने या मोहिमेत सक्रिय सहभागी होऊन पशुधन संरक्षणासाठी जनजागृती आणि प्रत्यक्ष सहाय्य केले. ज्यामुळे हा उपक्रम अधिक प्रभावी ठरला. डॉक्टर यांनी लंपी या रोगाबद्दल सविस्तर माहिती दिली. लंपी हा विषाणूजन्य रोग ज्यामुळे गाई म्हशीच्या त्वचावर गाठी, ताप आणि दूध उत्पादनात घट होते. लसीकरण यावरचा प्रभावी उपाय आहे. घटसर्प जीवाणूजन्य रोग, जो तरुण जनावरांमध्ये स्नायूमध्ये सूज आणि ताप निर्माण करतो, गंभीर परिस्थितीत मृत्यूला कारणीभूत ठरतो. या उपक्रमात कृषी दूतांनी सक्रिय सहभाग दाखवला. कृषी दुतांचा सहभाग आणि गावकऱ्यांचा सहभाग यामुळे ही मोहीम यशस्वी पार पाडली. या यशस्वी मोहिमेने हिंगणी हवेली येथे पशुधन संरक्षणाच्या दिशेने एक ठोस पाऊल उचलले आहे.

# माजलगाव सहदुय्यम निबंधक कार्यालयात महसूल दिन उत्साहात साजरा

माजलगाव । प्रतिनिधी

महसूल दिनानिमित्त दिनांक १ ऑगस्ट शुक्रवार रोजी माजलगाव येथील सहदुय्यम निबंधक कार्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून तो उत्साहात साजरा करण्यात आला. या दिवशी दस्त नोंदणीसाठी आलेल्या नागरिकांचे पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले आणि त्यांच्या योगदानाची दखल घेण्यात आली.

या कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरले, ते म्हणजे सलोखा योजना अंतर्गत दस्त नोंदणी करणाऱ्या मौजे नाखलगाव येथील शेतकऱ्यांचा सन्मान. त्यांनी या योजनेंतर्गत लाभ घेतले असून त्यांचाही पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. महिलांना प्रोत्साहन देण्यासाठी, निवासी सदनिका, फ्लॅट आणि बंगला खरेदीसाठी १ टक्के मुद्रांक शुल्क सवलतीच्या दरात दस्त नोंदणी करण्यात आली. या योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांचे विशेष कौतुक करण्यात आले, जे महिलांच्या आर्थिक सबलीकरणाच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल आहे.

या खास दिनाचे औचित्य साधून कार्यालयाची फुलांनी व फुग्यांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती. रंगीबेरंगी रांगोळीने परिसर अधिकच सुंदर व स्वागतार्ह वाटत होता.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये प्रभारी सहदुय्यम निबंधक जी.के.चौधरी, कनिष्ठ लिपिक व्ही.जी.मुनेश्वर, संगणक ऑपरेटर नामदेव लटपटे व सिद्धेश्वर बोबडे यांचा मोलाचा सहभाग होता. त्यांनी मिळून कार्यालयाच्या सजावटीपासून ते कार्यक्रमाच्या सुयोग्य नियोजनापर्यंत सर्व बाजूंनी सक्रिय भूमिका बजावली. महसूल विभागाचा हा उपक्रम लोकाभिमुख प्रशासनाची जाणीव करून देणारा ठरला असून नागरिकांमध्ये सकारात्मक प्रतिसाद पाहायला मिळाला.

# अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य लोकमान्य टिळक यांचे राजकीय विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत -प्राचार्य सोमनाथ घाडगे



पाटोदा । प्रतिनिधी

येतील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात आज राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी व साजरी करण्यात आली या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य सोमनाथ घाडगे सर प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शक प्राचार्य डॉ विश्वास कदम समाजशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ सुनील जाधव सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉक्टर रामकृष्ण प्रधान राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक बापू घोक्षे व्यासपीठावर उपस्थित होते सर्वप्रथम साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून व लोकमान्य टिळक यांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली विभागाच्या वतीने सर्व मान्यवर पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ लोखंडे बी बी यांनी केले प्राचार्य डॉ विश्वास कदम सर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर आपले विचार मांडले तर प्राचार्य सोमनाथ घाडगे सर यांनी लोकमान्य टिळक यांच्या विचारा सांगितले तर डॉ सुनील जाधव यांनी अण्णाभाऊ साठे यांचे साहित्याची विचार व लोकमान्य टिळक यांचे राजकीय विचार विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी महत्त्वाचे आहेत असे मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी विद्यार्थिनी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्राध्यापक रामकृष्ण प्रधान यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दत्ता चादर यांनी सहकार्य केले.

# इंदिरा गांधी कन्या विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक बोचरे यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा

दिंद्रुड । प्रतिनिधी

येथील इंदिरा गांधी कन्या शाळेचे मुख्याध्यापक अशोक बोचरे गुरुवार रोजी सेवा निवृत्त झाले. शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मोहनराव काका सोळंके यांच्या उपस्थितीत त्यांच्या सेवापुर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. इं. गांधी कन्या शाळेत आयोजित कार्यक्रमात बोचरे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. या निरोप समारंभासाठी विद्यार्थिनी, स्नेहीजन, नातेवाईक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार मोहनराव काका सोळंके होते. तर प्रमुख अतिथी म्हणून सचिव रामकृष्ण सोळंके, बाळासाहेब सोळंके, देवदूत प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडू खांडेकर आदी मान्यवर उपस्थित होते.१९८७ साली उमरी येथील कुंडलीक गिलबिले यांच्या



वाड्यात तत्कालीन आमदार मोहनराव सोळंके यांनी शार्दुलेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून शाळा सुरू केली. संस्थेच्या वाटचालीमध्ये सुरुवातीपासून बोचरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

यावेळी बोलताना मोहनराव काका सोळंके म्हणाले की, संस्थेच्या वाटचालीमध्ये शिक्षकांचा खूप मोठा वाटा असतो. आमच्या शाळेत शिकलेल्या ग्रामीण भागातील अनेक मुलामुलींनी विविध क्षेत्रात यश प्राप्त केले आहे ही या संस्थेसाठी गौरवाची बाब असल्याचेही ते म्हणाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या विकासामध्ये संस्थेबरोबरच शिक्षकांचाही खूप मोठा वाटा असल्याचे सांगून सोळंके यांनी बोचरे सरांच्या कार्याचा गौरव केला. याप्रसंगी बोचरे यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले की, माझ्या शैक्षणिक वाटचालीमध्ये काकांचे आशीर्वाद व मार्गदर्शनाचा खूप मोठा वाटा आहे. त्यांच्यामुळेच मी मुख्याध्यापक म्हणून यशस्वीपणे कार्य करू शकलो. तसेच विद्यार्थ्यांना शिकवताना मला जो आनंद मिळाला तो मी विसरू शकत नसल्याचेही ते म्हणाले.

यावेळी गौरी गिराम, राधिका माने या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. तसेच बोचरे सरांचे माजी विद्यार्थी बलभीम माथेले यांनीही आपल्या भावना व अनुभव विषद केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक रामराव लांडगे यांनी तर सूत्रसंचालन भक्ती सोळंके व पंकजा काशीद या विद्यार्थिनींनी केले. संस्कृती मिरकले हीने मान्यवर व उपस्थित यांचे आभार मानले. या कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## संस्थेला दोन लाखाची देणगी

निवृत्त मुख्याध्यापक अशोक बोचरे यांनी निरोप समारंभात आपण संस्थेला दोन लाख रुपयांची देणगी देत असल्याचे जाहीर केले. यापूर्वीही अनेक मुख्याध्यापक व शिक्षकांनी शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेला स्वयंस्फूर्तीने देणगी दिली असून त्यातून उमरी येथे शाळेसाठी सुंदर इमारत बांधण्यात येणार असल्याचे शार्दुलेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मोहनराव सोळंके यांनी सांगितले. संस्थेला दिलेली देणगी म्हणजे संस्थेप्रती असलेली कृतज्ञता व उत्तरदायित्व याचे उत्तम उदाहरण आहे.

# पुनंदगाव येथे लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती निमित्त ध्वजारोहण संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

शहरालगतच्या पुनर्वसन भागातील पूनंदगाव येथे साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती निमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ( शरद पवार ) पक्षाचे नेते मोहनदादा जगताप व शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या हस्ते पूनंदगाव येथील लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकात ठीक १०.३०.वाजता संपन्न झाला .

या वेळी कॉंग्रेस नेते दत्ता कांबळे, केदारेश्वर अर्बनचे अध्यक्ष भगवानराव कदम, कम्युनिस्ट पक्षाचे तालुका सेक्रेटरी शिवाजी कुरे , प्रहारचे युवक तालुकाध्यक्ष हरीश जाधव पत्रकार मच्छिंद्र उफाडे सुनील कुरे, हे प्रमुख पाहुणे म्हणून विशेष उपस्थित होते. सर्वप्रथम महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.यावेळी सरपंच रुद्रा कुरे, मा.सरपंच खाडे मा.ग्रा सदस्य



## मोहन दादा जगताप, राहुल सूर्यतळ यांची प्रमुख उपस्थिती

श्रीमंत घडशिंगे,ग्रा पं.सदस्य भारत घडशिंगे ग्रा.प.सदस्य प्रशांत घडशिंगे,ग्रा.पं.सदस्य परमेश्वर मुळे, मा.ग्रा.पं.सदस्य रमेश सौंदरमल,महादेव घडशिंगे,अशोक घडशिंगे, मच्छिंद्र शिरसागर, विक्रम अवचार ,राजेभाऊ शिंदे , योगेश गालफाडे ,अंकुश मुजमुले, श्रीराम अवचार,बाळू शिंदे, सतीश काकडे, रामभाऊ घडशिंगे, गंगाधर शिरसागर, बबलू मुरकुटे,बालू लोखंडे, सचिन झाडे, अमोल घडसिंगे, बबलू भिसे, अजय कांबळे, अप्पाराव घडशिंगे , ईश्वर घडशिंगे ,अमोल शिरसागर, भैय्या लोखंडे, निलेश कुरे , भाऊ जाधव,मयूर घडसिंगे आदीसह गावातील सर्व युवक ज्येष्ठांची उपस्थिती लक्षणीय होती. या कार्यक्रमाचे नियोजन माऊली लोखंडे, राहुल घडशिंगे, करण घडशिंगे, नितीन घडसिंगे, राज खंडागळे, सचिन झाडे, नितीन शिंदे, बाळू मुजमुले, यांच्यावतीने करण्यात आले. या कार्यक्रमासाठी मा.सरपंच पांडुरंग घडसिंगे, कर्णराज कुरे, लक्ष्मण घडसिंगे, विश्वनाथ मुजमुले, राजेभाऊ शिंदे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे आयोजन पत्रकार आनंत घडशिंगे, किसन लोखंडे यांच्यावतीने करण्यात आले होते.

# जिल्ह्यातील गंभीर गुन्हे उघडकीस येण्याचे प्रमाण वाढले

## पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी यंत्रणा कामाला लावली

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये गंभीर गुन्हे उघडकीस येण्याचे प्रमाण वाढले असून खूनाचा प्रयत्न, लग्नाचे अमिष दाखवून अत्याचार करणे, विनयभंग अशा प्रकारच्या गुन्ह्यामध्ये शंभर टक्के तपास पूर्ण करून आरोपी निष्पन्न केले आहेत.

बीड जिल्ह्यातील जुलै महिन्याच्या पोलीस विभागाच्या जारी केलेल्या आकडेवारीनुसार बीड जिल्ह्यामध्ये खुनाचे २६ ,खुनाचा प्रयत्न १२६, लग्नाचे अमिष दाखवणे ४३, विनयभंग २०९ अशा प्रकारचे गुन्हे दाखल झाले होते. या गुन्ह्यामध्ये पोलिसांनी शंभर टक्के तपास पूर्ण करून हे गुन्हे उघडकीस आणले.

याशिवाय जिल्ह्यात दरोड्याची तेरा प्रकरणे घडली होती. त्यातील दहा प्रकरणांमध्ये तपास पूर्ण केला. जबरी चोरीचे ४१ प्रकरणं दाखल झाली होती त्यातील २८ प्रकरणांमध्ये पोलिसांनी तपास पूर्ण केला. यादरम्यान स्नॅचिंग चे बारा प्रकरणं दाखल झाली त्यातील आठ प्रकरणाचा तपास पोलिसांनी लावला. घरफोडी प्रकरणामध्ये मात्र पोलिसांना फारसे यश आलेले दिसत नाही. यादरम्यान १२४ घरफोड्या झाल्या. मात्र यातील २१ प्रकरणातच पोलिसांना तपास पूर्ण करता आला. चोरीच्या प्रकरणांमध्ये ७७८ गुन्हे दाखल झाले होते. त्यातील १६०





प्रकरणाचा तपास पोलिसांना लावता आला. गर्दीच्या ठिकाणी मारामारी होण्याच्या ३८७ घटना घडल्या. त्यातील ३८० प्रकरणात पोलिसांनी आरोपी निष्पन्न केले. गंभीर दुखापत करण्याच्या ९५७ प्रकरणांपैकी ९५१ प्रकरणे पोलिसांनी उघडकीस आणली. बलात्कार झाल्याची ६४ प्रकरणे जिल्ह्यात दाखल झाली यातील ६२ प्रकरणे पोलिसांनी उघडकीस आणली. इतर इतर किरकोळ गुन्हे १४५७ दाखल झाली. त्यातील १३२१ गुन्ह्यांमध्ये पोलिसांना तपास लावता आला. गंभीर प्रकरणामध्ये पोलिसांनी ९० ते १००% गुन्ह्याचा तपास लावला आहे.पोलीस अधीक्षक पदी नवनीत कावत रुजू झाल्यापासून पोलिस यंत्रणा अधिक सक्षम झाली असून पोलिसांनी आपले कर्तव्य चोखपणे बजवावे म्हणून पोलीस अधीक्षक नवनीत कावत स्वतः प्रत्येक बाबीकडे बारकाईने लक्ष घालतात. त्यामुळे आता दिवसेंदिवस पोलीस यंत्रणा अधिक कार्यक्षम झाल्याचे दिसत असून पोलीस अधीक्षकांना अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचीही समर्थ साथ लाभत आहे. जिल्ह्यातील विविध प्रकरणांमध्ये जवळपास ८० टक्के प्रकरणांमध्ये पोलिसांनी तपास पूर्ण केला आहे. ही समाधानकारक बाब असून नागरिकांना अधिकाधिक संरक्षण देणे हे पोलिसांचे कर्तव्य आहे. मागील काळामध्ये पोलीस खात्याला मरगळ आली होती. मात्र अधीक्षक म्हणून नवनीत कावत रुजू झाल्यापासून आता पोलिस यंत्रणा अधिक सक्षम झाल्याचे दिसून येत आहे.

### या प्रकरणांमध्ये शंभर टक्के तपास

**जिल्ह्यात घडलेल्या खून, खुनाचा प्रयत्न, लग्नाचे अमिष दाखवणे, विनयभंग अशा प्रकरणांमध्ये पोलिसांनी शंभर टक्के तपास लावलेला आहे. जिल्ह्यात खुनाचे २६ ,खुनाचा प्रयत्न १२६, विनयभंग २०९, लग्नाच्या अमिष दाखवून पळून नेणे ४३, अशा प्रकारचे गुन्हे दाखल झाले होते, या प्रकरणाचा पोलिसांनी पूर्णपणे तपास लावल्याचे आकडेवारीवरून दिसून येत आहेत.**

## भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे 'साहेब चषक' टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी, पाटोदा, शिरूर कासार मतदारसंघाचे लोकप्रिय नेते मा.आ. भीमरावजी धोंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे ''साहेब चषक'' टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन करण्यात आले. या स्पर्धेचा शानदार शुभारंभ युवा नेते अभय राजे धोंडे यांच्या हस्ते उत्साहात पार पडला.



या उद्घाटनप्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यामध्ये युवा नेते आस्ताक भाई शेख, अतुल मुळे, इम्रान खान, प्रा. जफर शेख, नगरसेवक समीर शेख, सत्तार भाई पठाण, हादी शेख, शहानवाज पठाण, अवेज शेख, मुजाहिदीन पठाण, तोफीक बेग, वाजेद सय्यद, आमन शेख, अशोक करांडे, केरुळकर अनिकेत, जाधव सर, संभाजी वनवे यांचा सक्रिय सहभाग होता. स्पर्धेचे आयोजन न्यू निगाहे करम क्रिकेट क्लब (फजल बॅस) यांच्या पुढाकाराने करण्यात आले असून, या कार्यक्रमास परिसरातील क्रिकेटप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद दिला.



**बीड : आज बीड येथे काळे व आगरकर परिवाराचा साखरपुडा कार्यक्रमानिमित्ताने अवांतर खर्च टाळत स्व.मनोज भाऊ भानोसे सामाजिक प्रतिष्ठान यांच्या वतीने अनाथ मुलांचे संगोपन करणाऱ्या बीड येथील स्नेहसवली फाउंडेशन व क्रांतिसूर्य सेवाभावी संस्था मातोरी येथील मुलांसाठी शालेय साहित्य भेट दिली व बीड येथे और असलेल्या सावता महाराज मंदिर ट्रस्ट ला एक्कावन हजार रुपयांची मदत या वेळी केली गेली.**

## वैराग्याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा - इंदोरीकर महाराज

### श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे भाविक भक्तांची पहिल्याच दिवशी प्रचंड गर्दी

बीड । प्रतिनिधी

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे पहिले कीर्तन सेवा निवृत्तीनाथ महाराज इंदोरीकर यांचे संपन्न झाले. प्रथम कीर्तन पुष्प अर्पण करताना अभंग विवेचन करताना माणसाने जीवन



जगताना काम, क्रोध, मद, लोभ, मोह,मत्सर हे सहा विकार माणसाला पशु बनवतात माणसाला या सहा विकार मत केली की माणसाचा देव माणूस होतो. पान ३ वर

## नारायण वाघमारे यांचे निधन

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा महावितरण मधील वरिष्ठ प्रधान यंत्रचालक तथा मागासवर्गीय कर्मचारी विद्युत कर्मचारी पतसंस्था मर्यादित जिल्हा बीड चे संचालक



नारायण हरिभाऊ वाघमारे वय ५८ याचे आज सकाळी ६ वाजता चौसला येथे महाराष्ट्र विद्युत महामंडळाला कार्यरत असताना हृदयविकाराने निधन झाले त्याच्या निधनाने चौसाळा परिसरातून हळहळ व्यक्त करण्यात आली.

## माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांची आ.सुरेश धस यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

आष्टी । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातील दिग्गज घराणे समजले जाणारे राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांनी आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.



आष्टी राज्य परिवहन महामंडळात आगार वाहतूक नियंत्रक मोहिते परिवाराचे नातेवाईक असलेले संजय संभाजीराव निंबाळकर यांच्या सेवापूर्ती कार्यक्रमासाठी ते प्रामुख्याने उपस्थित होते. त्यानंतर त्यांनी आमदार सुरेश धस यांच्या निवासस्थानी भेट दिली. यावेळी जुन्या स्मृतींना उजाळा देण्यात आला विजयसिंह मोहिते पाटील यांचे आजोळ असलेले ब्रह्मगाव हे आष्टी तालुक्यात असून आष्टीच्या जवळ आहे. यावेळी आ.सुरेश धस यांनी मोहिते पाटील यांच्याशी संवाद साधताना ..जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष नंतर आष्टी पान ३ वर

## भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कृषी कालेजमध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन -प्राचार्य डा.श्रीराम आरसुळ

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी येथील आनंद चॅरिटेबल संस्था संचलित वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी संलग्न श्री छत्रपती,शाहू, फुले, आंबेडकर कृषी महाविद्यालय, आणि अ.नगर येथील अष्टविनायक रक्तपेढी यांच्या संयुक्त पुढाकाराने ५ ऑगस्ट २०२५ रोजी लोकनेते माजी आ.भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबिर म्हणजे लोकनेते भीमराव धोंडे यांच्या सामाजिक कल्याणासाठी असलेल्या वचनबद्धतेला आणि एका उदात्त कार्यात योगदान देण्याची संधी आहे.रक्त हे एक महत्त्वाचे साधन





आहे जे निर्माण करता येत नाही.तुमचे रक्तदान तीन जीव वाचवू शकते, अपघातग्रस्तांना,शस्त्रक्रिया करणाऱ्या रुग्णांना आणि जीवघेण्या आजारांशी झुंजणाऱ्या व्यक्तींना दुसरी संधी देते.रक्तदान करून तुम्ही तातडीच्या गरजूंसाठी जीवनरेखा बनते.रक्तदान शिबिर कृषी महाविद्यालयात सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत आयोजित केले जाईल.या प्रयत्नाचा उद्देश विद्यार्थी,कर्मचारी आणि स्थानिक रहिवाशांना या उदात्त कार्यात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करणे आहे.श्री. छत्रपती,शाहू,फुले,आंबेडकर कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.श्रीराम आरसूळ यांनी अशा मोहिमेचे महत्त्व अधोरेखित केले.रक्तदान करणे हे दयाळूपणाचे एक महान कृत्य आहे.जीवनाची देणगी देण्याचा हा एक सोपा मार्ग आहे. लोकनेते भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्याचा आणि आमच्या समुदायाच्या कल्याणासाठी पान ३ वर

## फुले चौकाची तोडफोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई करा -स्वाती कातखडे

पाटोदा । प्रतिनिधी

सामाजिक समतेचे प्रतीक व बहुजन समाजासाठी लढा देणारे क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या नावाने उभारलेला महात्मा फुले चौक, राशीन (ता. कर्जत, जि. अहिल्यानगर) येथे काही समाजकंटकांनी तोडफोड केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकारामुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, समाजात अस्वस्थतेचं वातावरण निर्माण झालं आहे.

या घटनेचा सावता सेनेच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला असून, सावता सेनेच्या बीड जिल्हा महिला अध्यक्ष स्वाती कातखडे यांनी संबंधित दोषींवर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. स्वाती कातखडे म्हणाल्या, ''महापुरुषांचा अपमान करणारे हे समाजकंटक समाजात तेढ निर्माण करत असून, अशांना वेळेवर शिक्षा न झाल्यास जनतेचा संयम सुटेल आणि आम्हाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावं लागेल.''या घटनेमुळे सामाजिक सलोखा धोक्यात येण्याची शक्यता आहे. म्हणूनच प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून आरोपींना अटक करावी, व अशा घटनांचा पुनरावृत्ती टाळण्यासाठी कडक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सावता सेनेच्या महिला बीड जिल्हाध्यक्षा स्वाती कातखडे यांनी केली आहे.

## बजरंग बनसोडे यांची मुंबई येथे पोलीस उप आयुक्त पदावर नियुक्ती

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुपुत्र व सध्या राष्ट्रीय तपास यंत्रणा दिल्ली येथे केंद्रीय प्रतिनियुक्तीवर असलेले अपर पोलीस अधीक्षक बजरंग बनसोडे यांची मुंबई येथे पोलीस उप आयुक्त पदावर गृह विभागाने गुरुवारी काढलेल्या आदेशानुसार नियुक्ती करण्यात आली आहे.



त्यांनी आजवर मिरज,अहमदनगर, नाशिक,नवी मुंबई इत्यादी ठिकाणी उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून यशस्वी पणे कामगिरी केली आहे.तसेच बुलढाणा येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून त्यांनी कारकीर्द गाजवली होती. त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक मोठे गुन्हे उघडकीस आणून पोलीस खात्याची मान उंचावेल अशी कामगिरी पान ३ वर

## पांदण रस्त्यांवरील अतिक्रमण हटवून ३० शेतकऱ्यांना दिलासा

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मौजे माजलगाव व दिंदृड शिवारात गेल्या अनेक वर्षांपासून अतिक्रमित असलेले चार पांदन शेतरस्ते माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर यांनी थेट बांधावर जाऊन मोकळे करून दिले.





दि १ ऑगस्ट महसूल दिनाच्या औचित्याने शासनातर्फे साजऱ्या होत असलेल्या महसूल सप्ताहाचा (१ ते ७ ऑगस्ट) याचाच एक भाग म्हणून ही कारवाई करण्यात आली.या उपक्रमा अंतर्गत मौजे माजलगाव शिवारातील दोन व दिंदृड शिवारातील दोन पांदन शेतरस्त्यांवरील अतिक्रमण काढून शेतकऱ्यांसाठी रस्ते खुले करण्यात आले.या कृतीमुळे सुमारे ३० शेतकऱ्यांना थेट लाभ झाला असून त्यांची शेतांपर्यंत सहज व विना अडथळा वाहतूक शक्य झाली आहे. या कारवाईच्या वेळी ग्राम महसूल अधिकारी रुपचंद आभारे,विलास मोरे,प्रमोद चव्हाण, अक्षय चंदेल, महसूल सेवक माऊली नरवटे तसेच संबंधित शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेतकरी वर्गाने तहसीलदार संतोष रुईकर यांचे शेतातच सत्कार करून समाधान व्यक्त केले व अशाच प्रकारच्या कारवाया सातत्याने व्हाव्यात,अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

## ग्रामीण भागातील ३ हजार विद्यार्थ्यांचा आशिर्वाद ना.पंकजाताई मुंडेंना लाभेल - संजय आंधळे

**वडवणी । प्रतिनिधी**

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड निर्माण व्हावी उद्देशाने वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील ३ हजार विद्यार्थ्यांना ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त २१ हजार वह्यांचे वाटप करण्यात आले असून या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शालेय जीवनात आवश्यक असणारे साहित्य मोफत मिळाल्याने त्यांचा आत्मविश्वास व अभ्यासातील रुची वाढेल, आणि या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील हजारो चिमुकल्या विद्यार्थ्यांचा आशीर्वाद ना. पंकजाताई मुंडे यांना लाभेल असे मत टोकेवाडी येथील शैक्षणिक,पर्यावरण सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमात भाजपचे युवा नेते संजय आंधळे यांनी व्यक्त केले आहे.**

महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण, वातावरणीय बदल मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वडवणी तालुक्यातील २५ गावे, बारा वाड्या आणि सहा तांडे येथील ५५ जिल्हा परिषद शाळांमध्ये भव्य शालेय साहित्य वाटप उपक्रम राबविण्यात आला असून या उपक्रमांतर्गत एकूण ३ हजार विद्यार्थ्यांना २१ हजार वह्या व विविध शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले आहे. तसेच ५०० गरजु विद्यार्थ्यांना स्कूल बॅग्स , दोन हजार कापडी पिशव्या देखील वितरित करण्यात आल्या आहेत. ५ हजार वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. या शैक्षणिक,पर्यावरण सप्ताहाची सुरुवात दि.२६ जुलैपासून करण्यात आली होती. याची सांगता दि.२ ऑगस्ट रोजी सांगता टोकेवाडी येथे करण्यात आली. शैक्षणिक,पर्यावरण सप्ताहाला गावोगावी अभुतपुर्व प्रतिसाद मिळाला असुन शाळकरी मुलांमध्ये



टोकेवाडीत शैक्षणिक व पर्यावरण सप्ताहाची उत्साहपूर्ण सांगता ना.पंकजाताई मुंडेंच्या वाढदिवसानिमित्त तिन हजार विद्यार्थ्यांना २१ हजार वह्या,शालेय साहित्याचे वाटप

आनंदाचे वातावरण असून विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. पालक वर्गाकडून या उपक्रमाचे कौतुक होत आहे. शिक्षणावरील ना.पंकजाताईंची सामाजिक बांधिलकी या उपक्रमातून प्रकर्षाने दिसून आली. पुढे बोलताना आंधळे म्हणाले की, लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब म्हणाले होते की, ग्रामीण भागातील ऊसतोड मजुरांच्या मुलांच्या हातातील कोयता सोडवुन त्यांच्या हातात पेन द्या, ग्रामीण भागातील मुले शिकली पाहिजेत, म्हणून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य उज्ज्वल व्हावे म्हणून हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण होणार असून, त्यांच्या शैक्षणिक गरजांना हातभार लागणार असुन याच्या माध्यमातून ग्रामीण भागातील चिमुकल्या विद्यार्थ्यांचा आशिर्वाद ना.पंकजाताई मुंडे यांना लाभेल. आणि हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मकता व पुढे जाण्याची प्रेरणा नक्कीच निर्माण करेल. ग्रामीण भागातील शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी तुम्ही हाक द्या आम्ही साथ देऊ. आणि भविष्यात ही शाळेच्या मदतीसाठी धावून येऊ असे आंधळे म्हणाले, शेवटी म्हणाले की, ना.पंकजाताईंचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने अविरतपणे साजरा करत राहणार असल्याचे मत भाजपा नेते संजय आंधळे यांनी व्यक्त केले आहे. यावेळी शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी ना. पंकजाताई मुंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सप्ताहाचे आयोजक भाजपा नेते संजय आंधळे , भाजपा तालुकाध्यक्ष सुखदेव रेडे,कृ.उ.बा. संचालक डॉ.रोहीदास खोटे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे, सरपंच संतोष कदम , चेअरमन गोरख यादव, सुशील कदम,पंडित यादव, अनिरुद्ध चिलगर, गोरख डोंगरे,बालासाहेब कदम, रामेश्वर कदम, श्याम यादव, सरपंच अशोक चोले, अभिमान दराडे, अशोक दराडे, बाबासाहेब चोले, अप्पा दराडे, अंगद खराडे, महादेव खराडे, वैजनाथ डोंगरे, उत्तम केकाण, सचिन केकाण, विलास चोले, सूर्यकांत चोले, छबू चोले, सुभाष राकुसले, राम डोंगरे,सह शिक्षक, गावकरी व विद्यार्थी उपस्थित होते.

## शोभा रत्नपारखी यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील धानोरा रोड परिसरात राहणाऱ्या सौ.शोभा मधुकरराव रत्नपारखी यांचे २४ जुलै रोजी हृदयविकाराच्या धक्क्याने दुःखद निधन झाले मृत्यू समयी त्यांचे वय ७३ वर्षाचे होते.

पिंपळनेर येथील मूळ रहिवासी असलेले मधुकरराव रत्नपारखी यांच्या पत्नी सौ. शोभा मधुकरराव रत्नपारखी यांना २४ जुलै रोजी हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार चालू असतानाच त्यांचे निधन झाले. त्यांच्यावर बीड येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, शेजारी, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती मधुकरराव, मुलगा महेश, मुलगी



मोहिनी, सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या कुटुंबीयांवर कोसळलेला दुःखाचा डोंगर यातून त्यांना दुःख सहन करण्याची ईश्वर ताकद देवो अशी ईश्वरचरणी प्रार्थना. त्यांचा गंगापूजनाचा कार्यक्रम ६ ऑगस्ट रोजी त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याचे परिवाराकडून सांगण्यात आले. रत्नपारखी परिवाराच्या दुःखात दैनिक राज्य लोक तंत्र परिवार सहभागी आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canal Road Beed, Tal. Dist. Beed-431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, (mokashe) Executive Editor Subhash Vilasrao Chaure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court cases in Beed tribunal. Email rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# जमिनीचा वाद टोकाला, सख्ख्या भावानं ८३ वर्षीय भावाचा काटा काढला, बाजरीच्या शेतातच मृतदेह पुरला

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात एक अत्यंत धक्कादायक प्रकार समोर आलाय. जेजुरी पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या मावडी गावात सख्ख्या भावानेच आपल्या ८३ वर्षीय भावाचा खून केल्याची घटना उघडकीस आली आहे. जमिनीच्या वादातून ही हत्या झाल्याचं प्राथमिक तपासात स्पष्ट झालं आहे.




१ ऑगस्ट रोजी मयत ज्ञानदेव लक्ष्मण भामे (वय ८३) यांचा मृतदेह मावडी गावातील बाजरीच्या शेतात संशयास्पद स्थितीत आढळून आला होता. या मृत्यूमागे काहीतरी गूढ असल्याची शक्यता लक्षात घेता जेजुरी पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला. शवविच्छेदन अहवालात मृत्यूला मारहाणीचे कारण असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

तपासादरम्यान पोलिसांना माहिती मिळाली की मृत ज्ञानदेव भामे आणि त्यांचा सख्खा भाऊ चांगदेव लक्ष्मण भामे (वय ६८) यांच्यामध्ये गेल्या काही वर्षांपासून जमिनीच्या मालकीवरून वाद सुरू होता. हा वाद इतका विकोपाला गेला की चांगदेव भामे यांनी अखेर संतापाच्या भरात आपल्या मोठ्या भावाचा खून केला. पोलिसांनी आरोपी चांगदेव भामे याला ताब्यात घेतलं असून त्याच्याकडे कसून चौकशी सुरू आहे. प्राथमिक चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली असून, जमिनीच्या वादातूनच हे टोकाचं पाऊल उचलल्याचं सांगितलं आहे. आरोपीने मृताच्या डोक्यावर आणि अंगावर घाव घालून त्याचा खून केल्याची माहिती मिळाली आहे.


या घटनेनं मावडी गावात आणि परिसरात एकच खळबळ उडाली आहे. वडिलोपार्जित जमिनीच्या वाटपावरून सख्या भावांनी हा टोकाचा पर्याय निवडल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून, न्यायालयात आरोपीला हजर करण्यात येणार आहे. चौकशीत आरोपीने गुन्ह्याची कबुली दिली असून, त्यांनी आधी भावाला शेतात बोलावून नेलं, त्यानंतर त्याच्यावर धारदार हत्याराने हल्ला करून जागीच ठार मारलं. हत्या केल्यानंतर मृतदेह बाजरीच्या शेतातच पुरला. मात्र, मृतदेह सापडल्यामुळे हा सर्व प्रकार उघडकीस आला. जेजुरी पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, त्याच्यावर भादंवि कलम ३०२ आणि इतर संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# कश्मीर फाइल्सप्रमाणेच द मालेगाव फाइल्स सिनेमा आला पाहिजे ; भाजपच्या मेधा कुलकर्णींचं वक्तव्य

**पुणे । प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर मालेगाव बॉम्बस्फोटातील (झेलश्ररीं) आरोपी ले. कर्नल प्रसाद पुरोहित यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली असून आज त्यांचं पुण्यातील (ंपिश) निवासस्थानी आगमन झालं. त्यामुळे, हिंदूत्ववादी संघटना व त्यांच्या समर्थकांनी पुण्यातील निवासस्थानाच्या बाहेर जल्लोष करत त्यांचे स्वागत केले. यावेळी, पुरोहित यांच्या उपस्थितीत शोभायात्रा देखील काढण्यात आली असून स्वतः पुरोहित या शोभायात्रेत सहभागी झाले होते. पुण्यातील भाजप नेत्या आणि राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी (चशवहर ज्ञींश्रज्ञरीपळ) यांनीही कर्नल पुरोहित यांच्या घरी जाऊन त्यांचे अभिनंदन व स्वागत केले. यावेळी, मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणावर भाष्य करताना त्यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला. तसेच, द कश्मीर फाइल्सप्रमाणेच द मालेगाव फाइल्स हा सिनेमा काढायला हवा, अशी मागणी देखील त्यांनी केली.



सर्वोच्च न्यायालयाने मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपींची निर्दोष मुक्तता केल्यानंतर राजकीय वातावरण तापले असून भाजपसह महायुतीमधील नेते काँग्रेसवर टीका करत आहेत. काँग्रेस सरकारच्या काळात हिंदुत्त्ववाद्यांना जाणीपूर्वक अडकविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे भाजप नेत्यांनी म्हटलं. त्यावरुन, राजकीय टीका टिपण्णी सुरू असतानाच खासदार मेधा कुलकर्णी यांनी मोठी मागणी केली आहे. कर्नल पुरोहित यांच्या निवासस्थानी त्यांचे स्वागत केल्यानंतर माध्यमांशी बोलताना कुलकर्णी यांनी आपली भूमिका मांडली.

'कश्मीर फाईल्स' सारखाच मालेगाव फाईल्स हा सिनेमाही झाला पाहिजे अशी मागणी भाजप खासदार मेधा कुलकर्णी यांनी आज केली आहे. पुण्यात मालेगाव बॉम्बस्फोटातील आरोपी असलेले कर्नल पुरोहित यांची निर्दोष सुटका झाल्यानंतर पुण्यात आज त्यांच्या घरी जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी खासदार मेधा कुलकर्णी यांनीही त्यांचं स्वागत केलं. यावेळी, बोलताना काश्मीर फाइल्स सारखाच मालेगाव फाइल्स हा सिनेमा काढावा, अशी मागणी त्यांनी केली. कारण काँग्रेसने त्यांच्या काळात फेक नेरटीव्ह पसरवले होते, त्यांचे पितळ उघडं पाडण्यासाठी मालेगाव फाइल्स हा सिनेमाही आलाच पाहिजे, असं मत खासदार कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

# विरोधी नेत्यांना टार्गेट केले जात आहे-रोहिणी खडसे

पुणे । प्रतिनिधी

सरकारविरोधात बोलणाऱ्यांवर कारवाई होते हे आता सर्व राज्याला माहिती आहे. विरोधी पक्षातील नेत्यांना टार्गेट केले जात असल्याचा आरोप करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्षा रोहिणी खडसे यांनी महायुती सरकारवर जोरदार टीका केली.खराडी ड्रग्ज पार्टीप्रकरणी पोलिसांनी माजी मंत्री एकनाथ खडसे यांच्या जावयाला अटक केली आहे. याची सर्वत्र चर्चा सुरु असताना रोहिणी खडसे यांनी शनिवारी (दि.२) राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेऊन त्यांच्याशी चर्चा केली.पक्ष संघटनेबाबत काही नियुक्त्या करण्याबाबत चर्चा करण्यासाठी शरद पवार यांची भेट घेतल्याचे त्यांनी भेटीनंतर स्पष्ट केले. अन्य प्रकरणांवर सविस्तरपणे भाष्य करणे त्यांनी टाळले.



त्या म्हणाल्या, पतीला भेटण्यासाठी पोलीस आयुक्त कार्यालयात गेले होते. एक वकील म्हणून त्यांना भेटले. कोर्टात दुसऱ्या दिवशी हजर व्हायचे होते आणि त्यांच्याकडून काही माहिती हवी असल्याने त्यांची भेट घेतली. त्यानंतर कार्यालयात पोलीस आयुक्त अमितेश कुमार असल्याने त्यांचीही भेट घेतली. पुणे पोलिसांच्या प्रश्नांना उत्तरे दिली आहेत. आता हा विषय न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यावर काही बोलणार नाही. योग्य वेळी, योग्य ठिकाणी पत्रकार परिषद घेऊन भूमिका स्पष्ट करेन. रूपाली चाकणकरांच्या टिकेबाबतही रोहिणी खडसे म्हणाल्या, त्यांना टीका करायची असेल तर करू द्या. योग्य वेळी प्रत्येकाला उत्तर देऊ. पाळत ठेवण्याचा हेतू नसल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# डीपी प्लॅन संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक

देहूगाव । प्रतिनिधी

नगरपंचायतीच्या विकास आराखड्याच्या (डीपी प्लॅन) अनुषंगाने नगरपंचायत कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. प्रशस्त रस्ते, उद्यान, वाहनतळ, विश्रामगृह, रुग्णालय आदी पायाभूत सुविधा उभारण्याच्या दृष्टीने या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. यामध्ये विकास कामांसाठी लागणाऱ्या जमिनी, शासकीय गायरान भूखंडांचा वापर, आणि रेड झोनसारख्या अडचणींचा आढावा घेण्यात आला.

देहू गाव ग्रामपंचायतीचे ८ डिसेंबर २०२० रोजी नगरपंचायतीत रूपांतर झाले. तेव्हापासून लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे अनधिकृत बांधकामे आणि नियोजनशून्य वसाहती वाढल्याने सार्वजनिक सुविधांच्या पुरवठ्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. विकास आराखड्याच्या माध्यमातून पुढील वर्षभरात डीपी प्लॅन तयार केला जाणार असून, त्यामध्ये एसटीपी प्लांट, प्रशस्त जलकेंद्र, वाहनतळ, रुग्णालय, ग्रंथालय, विश्रामगृह, विद्युत उपकेंद्र, नगरपंचायतीची प्रशस्त इमारत आदी सुविधा उभारण्याचा समावेश आहे. मात्र, अनेक जमिनी रेड झोनमध्ये येत असल्याने अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जमिनी न घेता शासकीय गायरान जमिनीचा वापर करण्याचा पर्याय चर्चेला आला.

तसेच, नागरिकांच्या जमिनींवर जर आरक्षण लागणार

# राज्यात कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती बिकट-रोहित पवार

**पुणे । प्रतिनिधी**

वाढत्या गुन्हेगारीने राज्यातील कायदा-सुव्यवस्था स्थिती बिकट झाली आहे. अजित पवार, एकनाथ शिंदे यांना अडचणीत आणण्यात मुख्यमंत्री व गृहमंत्री देवंद्र फडणवीस यांचा अधिक वेळ जात असल्याने त्यांचे कायदा सुव्यवस्थेकडे लक्ष नसल्याचा टोला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सरचिटणीस आमदार रोहित पवार यांनी लगाविला.



माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी पुण्यासह राज्यातील कोयता गँग, वाहन तोडफोड, महिलांवरील अत्याचार, मारामारी घटनांवर मत व्यक्त केले. ते म्हणाले, मुख्यमंत्री पुण्यात असताना, त्याच दिवशी गुन्हे घडतात, हे आश्चर्य म्हणावे लागणार आहे. गुन्हेगारी घटना थांबविण्याकडे फडणवीसांचे दुलर्क्ष आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या कामकाजावरही त्यांनी नाराजी व्यक्त केली.उद्योग क्षेत्रातील दादागिरी हा पुण्याच्या विकासातील सर्वांत मोठा अडथळा असल्याचे वक्तव्य फडणवीस यांनी केले होते. त्यावर रोहित पवार म्हणाले, पुण्यातील अनेक कंपन्या, उद्योगांना मुद्दाम त्रास देण्याची भुमिका काहीजण घेत आहेत. त्यामुळे अनेक कंपन्या बाहेरच्या राज्यात प्रामुख्याने गुजरातला जात आहेत. पुण्यातील एमआयडीसीत अजितदादा, एकनाथ शिंदे की भाजपची दादागिरी आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. महायुतीमध्ये ऑल इज नॉट वेल अशी अवस्था आहे.

सरळ काम तर सगळेच करतात. एखादे वाकडे काम करून पुन्हा नियमात बसवणारे असतात त्यांची नोंद ठेवली जाते, असे विधान नवे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले होते. याबाबतच्या प्रश्नावर ते म्हणाले, वाकड्या कामांमुळे महाराष्ट्राची तिजोरी वेडीवाकडी झाली आहे. वाकड्यात काम करण्यासाठी कृषिमंत्रीपद दिलेले नाही. सरळ काम करणाऱ्यांच्या पाठीशी आम्ही राहतो. वाकडे काम जर झाले तर महाराष्ट्र माफ करणार नाही. आम्हीही माफ करणार नाही.

# स्कूल बसच्या धडकेत महाविद्यालयीन तरुणाचा मृत्यू



**पुणे । प्रतिनिधी**

वडगाव बुद्रुक परिसरात सिंहगड महाविद्यालय रस्त्यावर स्कूल बसच्या धडकेत दुचाकीस्वार महाविद्यालयीन तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी सकाळी घडली. स्वप्नील संपतराव पवार (२३, रा. शिवाजीनगर, कडेगाव, जि. सांगली) असे मृत्युमुखी पडलेल्या दुचाकीस्वार तरुणाचे नाव आहे. तर दुचाकीवरील सहप्रवासी तरुणी ऋतुजा कदम हिला दुखापत झाली आहे. या प्रकरणी बसचालक धनाजी शंकर चव्हाण (४१, रा. ओंकार हाईट्स, नऱ्हे) याला अटक करण्यात आली आहे.

दुचाकीस्वार स्वप्नील आणि ऋतुजा हे शुक्रवारी सकाळी पावणे अकराच्या सुमारास वडगाव बुद्रुकमधील सिंहगड महाविद्यालय रस्त्याने निघाले होते. त्या वेळी विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बसने दुचाकीस्वार स्वप्नील आणि ऋतुजा यांना धडक दिली. यामध्ये स्वप्नील गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु, उपचारांपूर्वीच त्याचा मृत्यू झाला. पोलीस उपनिरीक्षक भुपेश साळुंके पुढील तपास करीत आहेत.

# भूसंपादनाच्या विरोधात हिंजवडीतील शेतकरी आक्रमक!

**हिंजवडी । प्रतिनिधी**

रहदारीला अडथळा ठरणारी अतिक्रमणे हिंजवडीतील ग्रामस्थ आणि व्यापारी वर्गाने स्वतःहून काढली आहेत. तरीही आता पीएमआरडीएकडून कोणताही मोबदला न देता भूसंपादनासाठी बळजबरी सुरू केली आहे. रस्ते विस्तारीकरणाच्या कामांमुळे हिंजवडी, माण परिसरातील बाधित शेतकरी आक्रमक झाले आहेत. पोलीस बंदोबस्तात सुरू असलेल्या या भूसंपादनास ग्रामस्थांनी तीव्र विरोध दर्शवून यंत्रसामग्रीसह आलेल्या प्रशासनाच्या पथकाला मागे फिरवण्यास भाग पाडले.



पोलिसांचा वापर करून डंपर, जेसीबी, पोकलंड अशा यंत्रसामुग्रीसह सुरू करण्यात आलेल्या रस्त्याच्या कडेचे सपाटीकरण आणि राडारोडा हटविण्याच्या कामांवर ग्रामस्थांनी थेट रस्त्यावर उतरून विरोध नोंदवला. आमच्या मालकीच्या जमिनी मोबदला न देता घेतल्यास ती दडपशाही मानली जाईल. आम्ही आंदोलन करू, किंवा गरज भासल्यास न्यायालयात जाऊ, असा निर्धार ग्रामस्थांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केला.

या पार्श्वभूमीवर हिंजवडी ग्रामपंचायतीच्या सभागृहात ग्रामस्थांची विशेष ग्रामसभा घेण्यात आली. यामध्ये भूसंपादन प्रक्रिया, मोबदला, तसेच गावठाणातील १८ ते २४ मीटर रुंदीच्या प्रस्तावित रस्त्यांविषयी सविस्तर चर्चा झाली. ग्रामस्थांनी स्पष्टपणे सांगितले की, प्रस्तावित मुख्य रस्त्यांनंतरच गावठाणातील रस्त्यांची कामे झाली पाहिजेत. तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रत्यक्ष संवाद साधून ग्रामस्थांचा विश्वास जिंकावा, अशी मागणीही यावेळी करण्यात आली. सध्या संपूर्ण परिसरात या मुद्द्यावरून तणावाचे वातावरण असून, राज्य सरकार व पीएमआरडीएकडून पुढील काय भूमिका घेतली जाते याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# पुणे रेल्वे स्थानकातील अंगावर काटा आणणारा व्हिडीओ व्हायरल; पोलिस कर्मचाऱ्याच्या सतर्कतेमुळे प्रवाशाला जीवदान!

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे रेल्वे स्थानकावरील एक अंगावर काटा आणणारी घटना समोर आली आहे. चालत्या रेल्वेत चढण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रवाशाला ही गोष्ट जीवघेणी ठरली असती. मात्र, संबंधित प्लॅटफॅार्मवर असणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्याच्या सतर्कतेमुळे प्रवाशी रेल्वे आणि प्लॅटफॅार्मच्या मध्ये पडता पडता वाचले आहेत. या घटनेचा व्हिडीओ सीसीटीव्हीत कैद झाला आहे. पुणे रेल्वे स्थानकावरील एका प्लॅटफॅार्मवर ही घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार ही घटना दोन दिवसांपूर्वीची आहे.

चालत्या रेल्वेत चढण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका प्रवाशाचा पाय घसरला आणि तो प्लॅटफॉर्म व ट्रेनच्या मधील पाताळात अडकण्याच्या मार्गावर होता. इतक्यात तिथे असणारे पोलिस कर्मचारी पांडुरंग चव्हाण यांनी धाव घेत प्रवाशाला हात दिला आणि बाहेर ओढले. त्यांच्या सतर्कतेमुळे पुढे होणारा मोठा अनर्थ टळला आणि प्रवाशाला जीवदान मिळाले. या घटनेचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. पांडुरंग चव्हाण यांच्या सतर्कतेची आणि साहसाचे कौतुक केले जात आहे.

# विसापूर किल्ल्याकडे जाणाऱ्या पर्यटकाचा पाय घसरून मृत्यू

**कार्ला । प्रतिनिधी**

लोणावळ्याजवळील विसापूर किल्ल्यावर जाणाऱ्या निसरड्या पायवाटेवरून पाय घसरून पडल्याने एका तरुण पर्यटकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. अब्राहम शिंसे (वय २९, रा. रामवाडी, पुणे) असे मृत व्यक्तीचे नाव असून, तो आपल्या मित्रांसोबत भाजे लेणी व विसापूर किल्ला परिसरात भटकंतीसाठी आला होता.



मिळालेल्या माहितीनुसार, भाजे धबधब्याच्या बाजूने विसापूर किल्ल्याकडे जाणारी एक पायवाट आहे. या मार्गावरून पर्यटकांची नेहमीच वर्दळ असते. अब्राहमही याच पायवाटेने किल्ल्याकडे जात असताना त्याचा पाय घसरून तो दगडावर जोरात आदळला आणि जागीच गतप्राण झाला. घटनेची माहिती मिळताच शिवदुर्ग रेस्क्यू टीमने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि मदतकार्य हाती घेतले. अपघातग्रस्त पर्यटकाला स्ट्रेचरच्या साहाय्याने खाली आणण्यात आले. यात सागर कुंभार, सागर दळवी, मोरेश्वर मांडेकर, यश मसने, राजेंद्र कडू, पिंटू मानकर, ओंकार पडवळ, अशोक उंबरे आदींनी सहकार्य केले. सध्या परिसरात मुसळधार पाऊस सुरू आहे. त्यामुळे डोंगराळ भागातील पायवाटा अत्यंत निसरड्या व धोकादायक बनल्या आहेत.काही पर्यटक सेल्फी, स्टंट किंवा रील व्हिडिओ तयार करताना सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करतात आणि त्यामुळे जीव गमविण्याच्या घटना घडत आहेत. स्थानिक प्रशासन आणि नागरिकांकडून वारंवार सूचना देण्यात येत असूनही पर्यटक अति उत्साहाच्या भरात धोका पत्करत आहेत. विशेषतः भाजे धबधबा परिसरातून विसापूर किल्ल्याकडे जाणारी पायवाट निसरडी, अरुंद आणि कठीण असल्याने ती टाळावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# लोणावळ्यात वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर

## उद्यापासून बाजारपेठ बंद करण्याचा व्यापाऱ्यांचा इशारा

**लोणावळा । प्रतिनिधी**

**मावळी पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारक चौकदरम्यान लावण्यात आलेल्या दुभाजकामुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीचा आणि गैरसोयीचा निषेध करत लोणावळा व्यापारी संघटनेने ४ ऑगस्टपासून संपूर्ण बाजारपेठ बंद ठेवण्याचा इशारा दिला आहे. यापूर्वी, १३ जुलै रोजी व्यापाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन दिले होते. मात्र, प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे संतप्त व्यापाऱ्यांनी आता बेमुदत बाजार बंदचा निर्णय घेतला आहे.**



व्यापाऱ्यांच्या मते, दुभाजकामुळे रस्ता अधिक अरुंद झाला असून, वाहतूक सुरळीत होण्याऐवजी कोंडीत वाढ झाली आहे. स्थानिक नागरिक, विद्यार्थी आणि पुणे-मुंबई मार्गे येणाऱ्या पर्यटकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अरुंद रस्त्यावर दुभाजक बसविल्यामुळे अपघातांचे प्रमाणही वाढले असून, दुचाकीस्वार जखमी होण्याच्या घटना घडल्या आहेत. या समस्येमुळे स्थानिक बाजारातील व्यवहारावरही परिणाम झाला आहे. आगामी रक्षाबंधन, जन्माष्टमी, गणेशोत्सव अशा सणांच्या पार्श्वभूमीवर बाजारात खरेदीसाठी होणारी गर्दी लक्षात घेता, दुभाजकामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागणार आहे, अशी भीती व्यापाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली आहे. व्यापाऱ्यांनी दुभाजक तात्काळ काढण्याची मागणी केली आहे. अन्यथा ४ ऑगस्टपासून बेमुदत बाजार बंद करण्यात येईल, असा इशारा व्यापारी संघटनेने दिला आहे.